CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ४२ | सोमवार दि. १० ऑक्टोंबर २०२२ ते रविवार दि. १६ ऑक्टोंबर २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## दोन भावांनी अचूक साधला नेम ठेकेदाराचा करून टाकला गेम

भंडारा/क्राईम रिपोर्टर

बांधकाम ठेकेदार म्हटला कि त्याच्या मागे अनेक कटकटी असतात. खास करून पोलीस, पालिका आणि स्थानिक गुंडांना सुद्धा सांभाळावे लागते. मात्र दोन दिवसांपूर्वी भंडारा जिल्ह्यातील तुमसर शहरात एका ठेकेदाराबरोबर बोरकर बंधूंचे भांडण झाले होते. याच भांडणाचा राग मनात ठेऊन या दोन भावांनी ठेकेदाराची निर्घुण हत्या केली. जुन्या वादात बांधकाम ठेकेदार असलेल्या शेजाऱ्याचा दोन भावांनी धारदार सुऱ्याने डोक्यावर व मानेवर सपासप ...पान ६ वर

## अश्लिल व्हिडिओ चॅटिंग करणारी महिलांची आहे टोळी नादी नका लागू अन्यथा घरदार विकायची येईल पाळी



लातूर/क्राईम रिपोर्टर

**माहिती आणि तंत्रज्ञान्याच्या सहाय्याने माणसाने खूप प्रगती केली आहे. इंटरनेट तर संपूर्ण जगाला जवळ आणले आहे. आज व्यापार, उद्योग, आरोग्य, संशोधन, शिक्षण आदी सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातोय. माहितीचे हे मायाजाल आज मिडिया आणि सोशल मिडीयाचा श्वास बनले आहे. पण शेवटी तंत्रज्ञान हे दुधारी तलवारी सारखे असते. त्याचा जसा चांगल्या कामासाठी वापर केला जातो तसाच वाईट गोष्टींसाठी दुरुपयोगही केला जातो आणि दुरुपयोग करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अनोळखी व्यक्तींकडून फेक कॉल करून एखाद्या माणसाची फसवणूक करणे किंवा व्हिडिओ कॉल वर आपल्या शरीराचे अंगप्रदर्शन करून एखाद्याला जाळ्यात ओढणे आणि ब्लॅकमेल करणे यासारखे प्रकार वाढू लागले आहेत आणि यात महिलांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातोय.**

दुर्दैवाने आपल्याकडे पोलिसांचा सायबर सेल असला तरी सायबर क्राईमला आळा घालण्याइतपत विकसित तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ सायबर सेलकडे नसल्याने सायबर गुन्ह्यांचा क्राईम वाढत चालला आहे आणि त्यात अनेक लोकांची खुलेआम फसवणूक केली जात आहे. सध्या प्रत्येकाकडे मोबाईल फोन असल्याने त्यावर फेसबुक, व्हॉटसअॅप, इस्ट्राग्राम आदी सोशल मिडीयाचा बेफाम वापर होतोय आणि हाच सोशल मिडिया आता सायबर गुन्हेगारांसाठी ब्लॅकमेलिंग करून पैसे कमावण्याचे माध्यम बनला आहे. फेक कॉल किंवा व्हिडिओ कॉल वरून होत असलेल्या लूटमारीच्या विरोधात एक कायदा केला आहे. त्यात अशा प्रकारची फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारास एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा आहे. मात्र तरीही असे गुन्हे घडत आहेत. अशाच गुन्ह्याचा एक भयंकर प्रकार लातूरमध्ये उघडकीस आला आहे. या ठिकाणी एका सर्व सामान्य कुटुंब वत्सल असलेल्या व्यक्तीस अनोळखी महिलेकडून व्हॉटसअॅप कॉल आला. त्याने तो रिसिव्ह केला आणि मी आपणास ओळखत नसल्याचे सांगितले. तरीही त्या महिलेने पुन्हा कॉल केला. तेंव्हाही त्याने त्या अनोळखी महिलेशी फारसे न बोलता तिचा कॉल कट केला. पण नंतर मात्र तिने व्हिडिओ कॉल करून आपले विवस्त्र शरीर दाखवायला सुरुवात करताच लातूर मधील त्या व्यक्तीला अक्षरशः घाम फुटला आणि त्याने कॉल कट केला. अशा प्रकारे व्हिडिओ कॉल वरून समोरच्या व्यक्तीच्या भावना चालवायचं आणि त्यालाही तसेच कृत्य करायला लावून त्याचा स्क्रीन शॉट किंवा व्हिडिओ रेकॉर्डिंग करून नंतर त्याला ब्लॅकमेल करायचे असे प्रकार सध्या सुरु असून लातूर मधील ज्या व्यक्तीला असा फेक व्हिडियो कॉल करण्यात आला त्याने या प्रकरणी पोलिसांकडे त्या अनोळखी महिलेच्या विरुद्ध रीतसर लेखी तक्रार नोंदवली आहे.

काही आंबट शौकीन पुरुषांना स्त्री देहाचे आकर्षण असते. त्यातूनच त्यांना फोन सेक्स करण्याचे व्यसन जडते. त्यामुळे काही लोकांनी याला व्यवसाय बनवला आहे. त्यासाठी रेट ठरलेले आहे. अश्लील संभाषणाचे रेट वेगळे आणि न्यूड व्हिडिओ कॉलचे रेट वेगवेगळे असतात. न्यूड व्हिडिओ कॉलसाठी १५ ते २० मिनिटाचे ५०० रुपयांपासून २००० रुपयांपर्यंत रेट आहेत. मात्र ही अश्लिल व्हिडिओ चॅटिंग धोकादायक असते. जर एखाद्या माणसाला एखाद्या मुलीने व्हिडिओ कॉल करून आपले अंग प्रदर्शन करते आणि त्यालाही आपले तसेच करायला सांगते आणि त्याने तिच्याप्रमाणे न्यूड होऊन तसे केले कि समोरची तरुणी पटकन त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड करते आणि त्याच्या आधारे पोलिसांकडे जाण्याची धमकी देऊन त्याला ब्लॅकमेल करते. काही दिवसांपूर्वी दिल्ली विद्यापीठातील एका ३५ वर्षीय प्राध्यापकाला फेसबुकच्या मेसेंजरवर ...पान २ वर

## प्रेयसीने लग्नाला नकार दिला प्रियकरानेच तिचा खून केला



मयत कविता



कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

**काही महिला अशा असतात कि चमडी देऊन दमडी उकलण्यात त्यांना काहीच वाटत नाही. कारण एकीकडे त्यांना पैसा मिळत असतो, तर दुसरीकडे शरीरसुख मिळत असते. खिंडी व्हरवडे गावात राहणारी कविता विधवा होती. मात्र तिला तीन मुले होतो असे असताना तिच्या पेक्षा वयाने १० वर्षांनी लहान असलेल्या तरुणाशी तिचे सुत जुळले. तो तिच्या दोन्ही गरजा भागवत होता. मात्र ती त्याला कायमची हवी होती. त्यासाठी त्याने तिच्या मागे लग्नासाठी तगादा लावला. पण मुले मोठी झाल्याने तिला लग्न करायचे नव्हते. पण तो ऐकत नव्हता. तर ती त्याला दाद देत नव्हती. त्यामुळे तो चिडला आणि एकेदिवशी त्याने अत्यंत निर्घुणपणे तिची हत्या केली.**



आरोपी राकेश

राधानगरी तालुक्यातील क.तारळे जवळील खिंडी व्हरवडे येथील कविता जाधव हिचा विवाह भुदरगड तालुक्यातील करडवाडी येथील प्रमोद जाधव याच्याशी गेल्या काही वर्षापूर्वी याच्याशी झाला. तो इलेक्ट्रीशयनचे काम करीत होता. गेल्या तीन वर्षापूर्वी त्याचे निधन झाले. पतीच्या निधनानंतर कविता ही एकाकी झाली होती. तिला दोन मुली व एक मुलगा होता. त्याच्या उदरनिर्वाहासाठी ती मोलमजुरी आणि शिवणकाम करीत होती. गेल्या वर्षी तिची दोन नंबरची मुलगी अजारी पडल्यावर नात्यातीलच राकेश जाधव याने तिला आर्थिक मदत केली खरी पण त्यातून त्याने तिच्याशी जवळीकता वाढवत तिच्याबरोबर शारीरिक संबंध ही ठेवले त्या दोघांचे संबंध बहरत असतानाच तो तिला आपण लग्न करूया म्हणून पाठीमागे लागला. पण तिन मुले आणि ती ही मोठी झालेली असताना कविताला त्याच्याशी लग्न करण्याची इच्छा नव्हती. अशातच तो तिला पैसे ही देत होता. ...पान २ वर

## भांडण सोडवायला जाऊन तो फसला बैजनाथ आपला जीव गमावून बसला





विरार/क्राईम रिपोर्टर

**आजकाल कोणाच्या भांडणात मध्यस्थी करायचे दिवस राहिलेले नाहीत. कारण भांडण करणारे लोक बाजूला राहतात आणि मध्यस्थी करणाऱ्या माणसाला जीव गमवावा लागतो. विरार पुर्वेकडच्या सहकार नगरमध्ये अशाच एका घटनेत गरबा खेळताना झालेल्या वादातून काही तरुणांनी एकाला रस्त्यात गाठून मारहाण करीत होते. मात्र यावेळी मध्यस्थी करायला गेलेल्या तिघांवरही त्या टोळक्याने हल्ला केला. या हल्ल्यात बैजनाथ शर्मा नावाच्या इसमाचा मृत्यू झाला असून या प्रकरणी विरार पोलिसांनी अवघ्या चार तासात ६ आरोपींना अटक केली आहे.**

विरार सहकार नगरच्या माळी कंपाऊंड येथे ६ ऑक्टोंबर २०२२ रोजी रात्री १२.३० ते १.०० च्या दरम्यान गरब्यातील ...पान ६ वर

## पत्नीबद्दल वाईट बोलताच तो चिडला मित्राला दगडाने ठेचून मुडदाच पाडला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

**कुठल्याही माणसाने मैत्रीचे नाते उंबरठ्याच्या आत आणू नये. कारण एकदा का एखादा मित्र घरात चुलीपर्यंत आला कि त्याची कधी नियत खराब होईल सांगता येत नाही. इचलकरंजीमध्ये महादेव आणि सुरज हे मित्र होते. त्यामुळे सुरज महादेवच्या घरी यायचा याच वेळेस महादेवच्या पत्नीवर सुरजची वाईटनजर पडली. मात्र हे महादेवला समजताच त्याने एकेदिवशी सुरजला दारू प्यायले नेले. यावेळी दारूच्या नशेत सुरज महादेवच्या पत्नीबद्दल अपशब्द उच्चारताच चिडलेल्या महादेवने सूरजच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली आणि स्वतःच पोलीस ठाण्यात हजर होऊन त्याने गुन्ह्याची कबुली दिली.**





इचलकरंजी शहराचा व्याप हा यंत्रमाग धंदयामुळे वाढला.या यंत्रमागावरती अनेकजण जगू लागले. यंत्रमाग धंदयातच वहीफणी असते. त्यावर ही शहर परिसरातील अनेक बेरोजगार तरूण वहीफणी करून आपल्या व आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. मुळचा साजणी येथील सुरज कांबळे हा इचलकरंजी शहरात मोलमजुरी करण्यासाठी काही वर्षापूर्वी आला. तो शहरातील रेणुका झोपडपट्टीत आपल्या मामाकडे राहू लागला. इचलकरंजी शहरात तो वहीफणी कामगार म्हणून काम करू लागला. याच धंद्यातील महादेव पोवार याच्याशी ...पान २ वर

## गुप्तधनाचा लोभ प्राणावर बेतला मांत्रिकाने आरतीचा जीव घेतला



मयत आरती

कोल्हापुर/क्राईम रिपोर्टर

**अंधश्रद्धा कधी कधी माणसाच्या नको ते करायला भाग पाडते आणि त्यातून कधी कधी माणसाला आपला जीव गमवावा लागतो. कोल्हापुरात राहणाऱ्या आरती सामंत हिच्या बाबतीतही असेच झाले. आपल्या भावाच्या देवघरात गुप्तधन आहे असा तिला दृष्टांत झाला होता. त्यामुळे त्या गुप्तधनाची तिला आस लागली आणि तिने मांत्रिकाची मदत घेतली. एका मांत्रिकाकडून काम झाले नाही म्हणून दुसरा शोधला, पण तोही अपयशी ठरला. त्यामुळे गुप्तधन शोधण्यासाठी ज्या मांत्रिकाला तिने पैसे दिले होते त्याच्याकडे ती दिलेले पैसे परत मागू लागली. पण पैसे परत करण्याऐवजी त्याने सरळ तिचा जीवच घेतला. या प्रकरणी पोलिसांनी मांत्रिकाला अटक केली आहे.**



पाडळी खुर्द येथील राजवर्धन पाटील याच्या बिगा शेतात एका ४५ वर्षीय महिलेचा मृतदेह पडला होता. यमत महिलेच्या डोक्याला मोठी जखम झाली होती. बहुदा ती वीट तिच्या डोक्यात जोरात हाणल्याने तिचा मृत्यू झाला होता. तिच्या खादयांवर ...पान ६ वर

## लघुशंकेवरून दोन भावात वाद पेटला थोरल्याने धाकट्याचा जीव घेतला







जळगाव/क्राईम रिपोर्टर

**संपत्तीचे वादात रक्ताची नातीही कुणी ओळखत नाही. अशावेळी मुलांनी आई-वडिलांचा तर भावाने सख्ख्या भावाचा खून केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. जेंव्हा नात्यातल्याच दोन माणसांमध्ये असे वाद असतात. तेंव्हा अशा वादाचे वणव्यात रूपांतर व्हायला शुल्लक कारण पुरेसे असते. उत्राणमध्ये राहणाऱ्या भगवान महाजन आणि सत्यवान महाजन या दोन भावांमध्ये राहते. घर विकण्यावरून वाद होता. मात्र एकेदिवशी सत्यवान बाथरूममध्ये लघुशंकेला गेल्यावर त्याने पाणी टाकले नाही. यावरून दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले आणि मोठ्या भावाने लहान भावाच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी आरोपी भावाला अटक करण्यात आली आहे.**

भगवान धोंडू महाजन आणि सत्यवान धोंडू महाजन हे दोघे सख्खे भाऊ होते. भगवान हा मोठा तर सत्यवान हा लहान भाऊ होता. एरंडोल तालुक्यातील उत्राण (गुजर हद्द) गावात राहणारे दोघे भाऊ अविवाहीत होते. भगवान याने वयाची साठी ओलांडली होती. दोघे भाऊ प्रौढ झाले होते. मात्र दोघांनी अद्याप लग्न केले नव्हते. एकाच ...पान ६ वर

## प्रियकरासोबत पळून जाण्याचा प्लान फसला प्रेमासाठी तिने सख्ख्या बहिणीचा जीव घेतला



अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

**प्रेमसंबंध किती जरी लपवण्याचे प्रयत्न केले तरी कधीना कधी ते उघडकीस येतातच आणि मुलीचे प्रेमसंबंध उघडकीस येणे म्हणजे समाजात बदनामी होण्यासारखे असते. नगर जिल्ह्यातील कोकमठाण गावात दोन बहिणी होत्या. मोठ्या बहिणीचे एका तरुणाशी प्रेम होते आणि ती प्रियकरासोबत पळून जाणार होती. मात्र हि गोष्ट तिच्या लहान बहिणीला समजताच तिने आई वडिलांना सांगितले. त्यामुळे मोठी बहिण चिडली आणि तिने लहान बहिणीची गळा दाबून हत्या करून तिला फासावर लटकावले आणि प्रियकरासोबत पळून गेली. मात्र पोलिसांनी तिला अटक केली आहे.**

आपली मोठी बहीण आपली मार्गदर्शक, गुरु असते. ती आपल्याला अनेक चांगल्या गोष्टी शिकवते. आपण आपल्या आयुष्यात अनेक गोष्टी पहिल्यांदा करत असतो. ...पान ६ वर

## मुलींच्या छेडछाडीला त्याने विरोध केला निरपराध तरुण गाव गुंडांच्या हातून मेला



मयत मुन्नाफ

धुळे/क्राईम रिपोर्टर

**आजकाल मुलींची छेडछाड करण्याचे प्रकार वाढत चालले आहे. रोड रोमियोना पोलिसांचा किंवा कायद्याचा धाक राहिलेला नाही. अशावेळी कुणी त्या मुलीची अब्रू वाचवायला गेला तर त्याच्यावर जीव गमावण्याचीही पाळी येऊ शकते. साक्री नजीकच्या जैतान गावात अशाच एका घटनेत मुलींची छेड काढणाऱ्या दोन गाव गुंडांना एका तरुणाने समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या मुलींच्या बाजूने बोलणे आणि त्यांच्या अब्रूचे रक्षण करणे त्या गाव गुंडांना आवडले नाही आणि त्या दोघांनी त्यांच्या अन्य तीन साथीदारांच्या मदतीने त्या तरुणाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**

शुक्रवार दि. १७ जुलै २०२२ ची ती संध्याकाळ. साक्री तालुक्यातील निजामपूर पोलीस स्टेशन अंतर्गतच जैतान हे एक छोटसं गाव. या गावात सायंकाळी दोन लहान मुली किराणा दुकानाकडे जात होत्या, तेंव्हा सागर अनिल खैरनार आणि मंगल उर्फ निलेश भदाणे या दोघांनी त्या मुलींचे हात धरून त्यांची छेडखानी केली. हे तिथे असणाऱ्या असरार मुनाफ मणियार या तरूणाने पाहिले. 'म्हातारी मेल्याचं दुःख नाही, काळ सोकावतोय.' म्हणून त्याने सागर आणि निलेश या दोघांना समज दिली, पुन्हा गल्लीतील मुलींची छेड





काढू नका असे समजावून सांगितले, पण यातून त्यांच्यात शाब्दिक बाद झाला. असरारचे हे सांगणे सागर आणि निलेश यांना ...पान २ वर

CMYK

10 TO 16 OCTOBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/8/2022 9:42 PM Page 1



पान १ वरून....

## अश्लिल व्हिडिओ चॅटिंग करणारी...

एक व्हिडिओ कॉल आला होता. प्राध्यापकाला काही कळण्याच्या आधीच स्कॅमरने व्हिडिओ कॉल रेकॉर्ड केला आणि तो सोशल मिडीयावर पोस्ट करण्याची धमकी देऊन २० हजार रुपयांची मागणी केली. मात्र त्या प्राध्यापकाने तत्काळ आपले फेसबुक खाते बंद केल. असाच प्रकार एका ७५ वर्षाच्या वृद्धाच्या बाबतीत घडला. त्यालाही व्हिडिओ कॉल करून अश्लील चॅटिंग करण्यात आली आणि त्याचा व्हिडीओ कॉल रेकॉर्ड करून पोलिसांकडे जाण्याची धमकी देऊन अडीज लाख रुपये उकळण्यात आले. सध्या असे प्रकार सर्रासपणे सुरु आहेत. पण त्यांना आळा घालण्यात आपले सायबर क्राईम खाते अपयशी ठरत आहे. कारण सरकारने अशा गुन्ह्यात १ वर्षाच्या शिक्षेचा कायदा तर केला, पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारी आवशयक ती यंत्रणा आणि मनुष्यबळ उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे हे गुन्हे वाढत चालले आहेत आणि यात अनेकांची फसवणूक होत आहे. हे गुन्हे करणारा कुणी एकटा दुकटा नसून या टोळ्या आहेत आणि त्यात समोरच्याला पटवण्याची आणि सगळ दाखवण्याची क्षमता असलेल्या मुलीही आहेत. म्हणून हा धंदा खुलेआम सुरु आहे. त्यामुळे सर्वात प्रथम यांना लोकांचे नंबर कसे मिळतात, इथुन तपासाला सुरुवात करून या टोळीचे नेटवर्क कुठपर्यंत पसरलेले आहे याचा पोलीस आणि खास करून सायबर सेलने शोध घ्यावा.

## प्रेयसीने लग्नाला नकार दिला...

ती त्याच्याकडून पैसे घेत असल्याने तो तिच्या मागे लग्न करण्याचा घाट घालत होता. ती मात्र त्याच्याशी लग्न न करता आपण एकत्रीत राहू या असे सांगत त्याला टोलवत होती. यातूनच त्या दोघातील वाद हा एकोपाला गेला. त्याची परिणीती गेल्या रविवार म्हणजे २ ऑक्टोंबर रोजी तिच्या हत्येत झाली. राकेश याने तिला क.बावडा येथील आपल्या राहत्या घरी बोलावून घेतले. तेथे त्या दोघांचा वाद चालू झाल्यावर दोघे ही एकमेकांच्या अंगावर जात होते. त्यातूनच त्याने तिच्यावर कोयत्याने वार करीत तिची हत्या केली. वयाच्या ३५ शीतील कविता ही देखणी आणि सुंदर अशीच होती. पती निधनानंतर तिची फिगर कमसीन आणि आकर्षक झाली होती. क.बावडा येथील राकेश संकपाळ हा तिच्या नात्यातीलच होता. त्याने तिच्याशी जवळीकता वाढवत संबंध प्रस्थापित केले. गेल्या दोन वर्षापूर्वी कविताची दोन नंबरची मुलगी आजारी पडल्यावर त्याने तिला आर्थिक मदत केली. याच संधीचा फायदा घेत तो तिला बाहेर फिरायला घेऊ जावू लागला. ते दोघे ही बाहेर जावून मजा मारत होते. तो तिची गरज ओळखून होता. तिला कोणाचा आधार नाही हे त्याने ओळखले होते. कविता त्याला जाम आवडली होती. म्हणून तो तिला आपल्या अंगखाली घेऊन तिची प्रत्येक गरज पुर्ण करीत होता. विवाहबाहय संबधात ते दोघे अडकत चालले होते. कविताची मोठी मुलगी गडहिंग्लजला डी फार्मसी करीत असते. तर एक मुलगी आणि मुलगा हे दोघे शालेय शिक्षण घेत आहे. ती आपल्या सासू मुलासह खिंडी व्हरंवडी येथे मोलमजुरी करून आणि शिवण काम करून आपल्या कुटुंबाचा उदर निर्वाह करीत होती. त्यातच राकेशशी तिची जवळीकता वाढल्यावर तो तिला खर्चाला थोडाफार हातभार लावीत होता. तशी ती चालूच होती. ती त्याला चमडी देवून दमडी उकळीत होती. त्याला ही तिच्याकडून शरीरसुखाची चटक लागल्याने ती मागेल त्यावेळी तिला तो पैशाची मदत करीत होता. ते दोघे ही नात्यातील असल्याने दोघांचे ही एकमेकांच्या घरी नेहमी येणे जाणे असायचे तरींही त्या दोघांच्या संबंधाची कोणाला जास्त माहिती नव्हती. राकेश याचे ही लग्न अदयाप झाले नव्हते. त्यामुळे ती त्याला आपल्या राणीची झलक दाखवून त्याचेकडून पैसे काढत होती. त्या दोघांचे संबंध इतके वाढीस लागले होते की त्याला तर तिच्यावाून करमत नव्हते. तो तिच्याशी सारखा मोबाईलवरून संपर्क करून कोल्हापूरला भेटायला बोलवित होता. तो बोलवला म्हटले की ती ही घरात सासुला काही तरी कारण सांगून त्याला भेटायला येत होती. तो तिला बाहेर भेटायला बोलावून तिच्याशी मजा मारत होती. ती त्याच्याशी मजा मारून आपली गरज पूर्ण करीत होती. पतीच्या निधानानंतर तर तिची जवानी ओसांडून वाहत होती. शारीरिक सुखाला ते दोघे ही चटावलेले होते. अशातच त्या दोघाच्या संबंधाची चर्चा ही दोघांच्या ही घरात होत होती. विशेष म्हणजे राकेश संकपाळच्या घरातील लोकांना म्हणजे त्याच्या आई वडिलांना व भावाला त्या दोघांच्या संबंधाची माहिती झाली होती. म्हणून ते त्याचे लग्न दुसऱ्या मुलीशी करणार होते परंतु त्याला कविताशीच लग्न करायचे असल्याने तो लग्नाला तयार होत नव्हता. त्याला तर तर इतकी आवडली होती की तो तिच्याशिवाय जगूच शकत नव्हता. इतका तो तिच्या प्रेमात वेडा झाला होता. खरे तर त्या दोघांच्या वयात दहा वर्षाचे अंतर होते. ती त्याच्यापेक्षा मोठी होती. ती त्याच्यापेक्षा वयाने मोठी असल्याने शिवाय ती विधवा असल्याने राकेशच्या घरचे लोक त्याच्या लग्नाला विरोध करीत होते. तरी ही तो मी लग्न करेन तर तिच्याशीच असे म्हणत तो तिच्या मागे लग्नासाठी आग्रह धरीत होता. एकदा ते दोघे बाहेर लॉजला मजा मारण्यासाठी गेले असता रुममध्ये ते दोघे शरीर सुखाचा आनंद लुटत होते. तो तिच्या कमसीन जवानीवर तुटून पडला असताना त्याने लग्नाचा विषय काढल्यावर तिने त्याला अंगावरून बाजुला ढकलून दिले. ती ही अर्धनग्न होती. मला तुझ्याशी लग्न करायचे नाही, मी विधवा आहे,शिवाय माझी मुलगी मोठी झाली आहे. मुले ही मोठी झाली आहेत त्यामुळे मी जर लग्न केले तर समाजात माझी बदनामी होईल. आपण लग्न न करताच एकत्रीत राहू या असे ती म्हणाली. त्यावेळी तिने त्याला शरीर सुख घेऊ दिले नाही. त्यामुळे तो तिच्यावर चिडला होता. कविता ही आपल्याकडून पैसे घेऊन शरीर सुख ही घेऊ देत नाही याच गोष्टीचा राग त्याला आला. तो तिला शिव्या देत मारहाण करू लागला. ती त्याला तु मला परत भेटू नकोस असे म्हणत त्या दोघांनी आपला कार्यक्रम आवरता घेतला. दोघे ही भांडत भांडतच तेथून बाहेर पडले. तिच्या राणीचे सुख त्याला त्यावेळी मिळाले नसल्याने तो कमालीचा अस्वस्थ झाला होता. त्यानंतर बरेच दिवस गेल्यावर त्याने परत तिला फोन केला. ती त्याला भेटायला तयार नव्हती. तरी ही ती त्याला नाही होय म्हणत तयार झाली. कारण तिला ही त्यावेळी पैशाची गरज होती म्हणून ती त्याला भेटायला आली त्यावेळी तिने त्याच्याकडून अगोदर पैसे घेतले आणि मगच त्याला शरीर सुख घेऊ दिले. त्यावेळी ही त्याने तिच्याकडे लग्नाचा विषय काढला परंतु तिने तो विषय मुद्दामच बाजुला करीत त्याला ताकास तुर लागू दिले नाही.तो सारखा तिच्याकडे लग्नाचा विषय काढून तिला दबाव टाकत असल्याने एकदा तिने ही त्याला धमकी दिली की, मी तुझ्या विरोधात पोलीसात तक्रार दाखल करून तुला बदनाम करेन. तु माझ्यावर जबरदस्ती करीत आहेस असे पोलीसांना सांगेन असे म्हटल्यावर राकेश हा घाबरला.तरी ही तो तिच्या मागे लग्न करण्याचा तगादा लावीत होता. खरे तर ती पतीच्या निधनानंतर राकेशबरोबरच्या संबंधात भरकटली होती. पण तसे ती दाखवित नव्हती. तिला त्याच्याकडून शरीर सुख घेऊन पैसे पाहिजे होते. पण नवरा म्हणून राको हा नको होता. यामागे कोणते ही कारण असले तरी दोघांची ही गरज ही सारखीच होती. तो तिच्या प्रेमात इतका वेडा झाला होता की त्याला तिच्या वाचून काही करमत नव्हते. ती त्याला त्या कामासाठी हवी असली तरी तो तिच्याशी लग्न करायला तयार होता. पण तीला ते पटत नव्हते. तिला समाजाची भिती होती. शिवाय तिची मुले ही मोठी झाल्याने तिला लग्न नकोच होते. त्या दोघे ही एकमेकांचे नातेवाईक असल्याने दोघांना ही कशाची भिती नव्हती. खरे तर ती त्याला आपली चमडी देवून त्याच्याकडून दमडी घेत असल्याने त्याच्या मनात ती आपल्याला फसवत आहे अशीच भावना तयार झाली होती.काही ही करून त्याला तिच्याशी लग्न करायचे होते.ती तयार होत नसल्याने तिचा कायमचा काटा काढयाचा या विचारात तो होता.म्हणून त्याने एक प्लॅन केला. तो तिच्याशी सतत सपंर्कात होताच शनिवारी त्याने कविताला फोन लावून दुसऱ्या दिवशी भेटायला बोलविले. ती ही गडहिंग्लजला मुलीला भेटायला जाते असे सासूला सांगून घरातून बाहेर पडली. ती येणार याची त्याला खात्री होती. त्या आधी त्याने बाजारातून एक कोयता विकत आणला.दुसऱ्या दिवशी त्याने आपल्या घरातील वयोवृध्द आई वडिलांना मुद्दामच परगावी पाठविले. दुसऱ्या दिवशी रविवार दि.२ ऑक्टोबर रोजी ठरलेल्या वेळेत क.बावडा येथील शहाजीनगर कॉलनीतील त्याच्या घरी कविता त्याला भेटायला आली. घरात कुणीच नसल्याने लग्नाच्या विषयावरून त्या दोघात भांडण चालू होते.तो तिला तु माझ्याकडून पैसे ही घेतेस आणि लग्नाला ही तयार होत नाहीस म्हणून भांडत होता. त्याच दरम्यान राकेश याचा भाऊ घरी आला.त्या दोघांना भांडताना बघून त्याने त्या दोघांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. ते दोघे ही ऐकत नसल्याने तो बाहेर गेला. त्या दोघात भांडण चालूच होते. याची खबर मात्र त्याने बाहेर कोणाला लागू दिली नाही. ती ही भांडणात त्याला नको ते बोलत होती. तिला त्याच्याशी लग्न करायचे नसल्याने ती घरातून बाहेर जात असताना त्याने घरात लपवून ठेवलेला कोयता घेतला आणि तिच्या मानेवर आणि शरीरावर रागाच्या भरात जोरात घातला. त्यासरशी ती ओरडतच खाली पडली.तिच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होत होता.ती खाली पडली.फरशीवर रक्त मोठया प्रमाणात पडले.तिचा जागीच मृत्यू झाला. तिचा आपल्या हातून खून झाल्याचे बघून तो घाबरला.त्याने शांत डोक्याने विचार केला. घराला बाहेरून कडी लावून तो बाहेर पडला. पण त्याच्यां शर्टावर रक्ताचे डाग पडलेले होते हे त्याच्या लक्षात आले नाही.तो पळत आणि घाई घाईत चालला होता. ही घटना दुपारची होती. त्याच्या शर्टावर रक्ताचे डाग पडल्याचे अनेकाच्या लक्षात आले होते. त्यांना शंका आल्यांने त्यांनी त्याला आडविले परंतु तो थांबला नाही. त्यांनी त्याच्या राहत्या घरात जावून पाहिले तर घरात एक महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली असल्याचे व बाजुलाच रक्ताने माखलेला कोयता पडला असल्याचे दिसल्यावर त्यांनी या घटनेची माहिती पोलीसांना दिली.शाहुपुरी पोलीसांना ही शंका आल्याने त्यांनी घटनास्थळी येवून पाहिले. घरात रक्ताच्या थारोळ्यात महिला पडली असल्याने त्यांना खूनाची शंका आली.या घटनेची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषनाच्या पोलीसांना समजताच त्यांनी तातडीने हालचाल करीत घटनेनंतर पळून जाणाऱ्या राकेश संकपाळ याला ताराराणी पुतळ्या जवळून ताब्यात घेतले.त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देवू लागला.त्याच्या शर्टावरील रक्ताच्या डागावरून पोलीसांना शंका आली.त्यांनी त्याच्याकडे चौकशी केली असता तो पोलीसांना मी कुणाचा खून केला नाही असे तो पोलीसांना सांगत होता.पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. दरम्यान शाहुपुरी पोलीसांनी घटनास्थळी जावून घटनेचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत कविताच्या नातेवाईकांना दिली. त्यांनी ही घटनास्थळी धाव घेतली. ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून केली आहे याची जवळपास माहिती पोलीसाना मिळाली होती. शिवाय संशयीत आरोपी ही पोलीसाच्या ताब्यात होता.मयत कविता याच्या नातेवाईकांच्या दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी कविता प्रमोद जाधव (वय ३५) हिच्या खून प्रकरणी राकेश शामराव संकपाळ (वय ३०) रा.क.बावडा कोल्हापूर याच्या विरोधात कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला.या घटनेचा तपास शाहुपुरी पोलीसा बरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पथकाने केला. विवाहबाहय संबंधात अडकलेली महिला ही वाहवत गेली की, ती कोणाचीच नसते.त्यातच ती विधवा असली की, तिला पैशाची आणि त्या संबंधाची चटकच लागलेली असते .खरे तर त्या संबंधात ते दोघे वाहवत गेलेले असतात.आणि त्यातूनच अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## पत्नीबद्दल वाईट बोलताच तो...

त्याची ओळख झाली. महादेव पोवार हा वहीफणी धंदयातील एंजट होता. तो दररोज वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कारखान्यात वहीफणी कामगार पुरवत होता. ज्या कारखान्यात वहीफणी असेल त्या ठिकाणी तो कामगारांना ने आण करीत होता. त्याचे कमिशन त्याला मिळत होते. सध्या यंत्रमाग धंदयात गुंडी बंडी कामगार रोज मिळत असल्याने कारखाना मालकाचे हे फावत असते. ज्या त्या दिवसाचा रोख पगार कामगाराला दिला की कारखाना मालक हा मोकळा होता. कायम कामगारांना दिवाळीच्योवळी बोनस आणि सर्व्हिस दयावी लागत असल्याने हल्ली ते ही गुंडी बंडी कामगारांना शोधत असतात. एंजट लोक ही कारखानदारांना कामगार पुरवून त्याचेकडून कमिशन मिळवित असल्याने त्याची ही दिवसाची हजेरी पडत असते. हे एंजट लोक ही काही फार शिकलेले असतात असे नाही. जॉबर आणि वहीफणी कामगार तसेच यंत्रमाग कामगार याच्याशी त्याची ओळख ही असेतच. सुरज कांबळे आणि महादेव पोवार यांची या धंदयातूनच ओळख वाढली. तसे ते दोघे चांगले मित्र बनले. सुरज हा वहीफणी बांधण्याचे काम करीत असल्याने महादेव हा त्याला काम असेल त्या ठिकाणी घेऊन जात होता. त्याला काम देवून तो आपल्या घराकडे येत होता. सुरज सारखे अनेक यंत्रमाग कामगार, वहीफणी कामगार तारा देणारे अनेक लोक त्याच्या संपर्कात होते. तो त्यांना काम देवून मालकाकडून कमिशन घेऊन मोकळा होत होता. एखाद्या कारखानदाराने त्याने नेमून दिलेल्या कामगाराला कामाचे वेळेत पैसे दिले नाहीत तर ते पैसे देण्याची जबाबदारी ही महादेव पोवार याच्यावर होती. सुरजने महादेव पोवार याच्या माध्यामातून दोन ठिकाणी काम केले होते.त्या कारखानदाराकडून महादेव याने सुरजच्या कामाच्या पैसे घेतलेले होते. पण ते पैसे त्याने सुरजला दिले नव्हते. त्या दोघात चांगली मैत्री असल्याने सुरजने सुरूवातीला त्याचेकडे पैसे मागितलेले नव्हते. काही कारणास्तव त्याने पैसे वेळेत दिले नाहीत म्हणून तो ही त्याची अडचण समजावून घेऊन गप्प बसला होता.याला चांगले दोन तीन महिने झाले होते. ते दोघे ही मित्र असल्याने खायला प्यायला एकत्र बसत होते.शुक्रवार हा इचलकरंजीतील कामगाराचा हक्काचा वार या दिवशी कामगार मालकाकडून पैसे घेऊन, घरी पगार देवून उरलेल्या पैशाची दारू पित असतात. तसे तर दररोज दारू पिणाऱ्याला रोजचा दिवस हा सारखाच असतो. महादेव आणि सुरज याचेत पैशाची देवघेव ही ठरलेलीच असायची.सुरज हा त्याचेकडून लागेल त्यावेळी पैसे उचलत होता. मागील पैशाचा हिशोब अजून त्याचेत झाला नव्हता. ते कायम एकत्र दारू प्यायला बसायचे.दारू पिण्यासाठी आडरानात जात होते. सुरजच्या मते महादेव हा त्याला पैसे दयावे लागत होता. तर महादेव याच्या मते सुरज पैसे देणे लागत होते. दोघांच्या देण्या घेण्याचा हिशोबाचा ताळमेळ लागत नव्हता. दारू पिल्यानंतर या देण्या घेण्यावरून त्याचेत बऱ्याचवेळेला वाद हा होत होता. दोघे ही भांडता भांडता एकमेकाच्या अगांवर शिव्या देऊन जात होते.पण दुसऱ्या दिवशी हा वाद मिटलेला असायचा कारण महादेव याला वेळेत वहीफणी कामगार मिळत नव्हते. तो जास्ती जास्त सुरजवरच अवलंबून असायचा. दोघाच्या घरी एकमेकांचे येणे जाणे असल्याने दोघाच्यातील वाद हा कधीच विकोपाला गेला नव्हता. मात्र दारू प्यायला नंतर दोघांची गाडी घसरत होती.सुरज याचे अजून लग्न झालेले नव्हते. तर महादेव याचे लग्न होऊन त्याला दोन मुले बाळे ही होती. दोघांच्या ही घरची परिस्थीती तशी बेताचीच होती. सुरज हा मामाकडे राहयला असल्याने त्याला विचारणारे तसे कुणी नव्हते. दारू पिऊन सुरज हा महादेवच्या घरी गेला की तो एकटक त्याच्या बायकोकडे बघत असायचा. ती ही देखणी सुंदर असल्याने सुरजला आवडली होती. म्हणून तो काही तरी कारण काढून सारखा महादेवच्या घराकडे जात होता. सुरजची आपल्या बायकोकडे वाईट नजर आहे हे महादेवने ओळखले होते. म्हणून त्याने त्याला एकदा दोनदा ताकीद देवून माझ्याघराकडे येवू नकोस असे बजावले होते. तरी सुरज हा त्याच्या घराकडे पैसे मागण्याच्या हेतूने येत होता. मागील देण्या घेण्याचा वाद तर अजून मिटलेला नव्हता. गेल्या दोन अडीच वर्षापासून हा वाद त्या दोघात घुमत होता.सुरज हा त्याला पैशाच्या कारणातून सारखा पिडत होता. याचा राग महादेव याला आला होता. सोमवार दि.३ ऑक्टोंबर रोजी सकाळी सुरज हा कामावर जाण्यासाठी घरातून बाहेर पडला. त्याचवेळी त्याच्या मोबाईलवरती महादेव याचा फोन आला. दोघे ही एकाच ठिकाणी कामावर जात असल्याने महादेवने त्याला आपल्या दुचाकीवर बसविले. काही अंतर पुढे गेल्यावर महादेव याने त्याला दारू घेवू या का? असे विचारले. नेमके सुरजला तर तेच हवे होते. कामावर तर जायचे आहे दारू ढोसूनच कामावर जावू या असे सुरज त्याला म्हणाला. शहापूर मार्गे ते दोघे लोटस पार्कमधील एका कारखान्यात त्यांना जायचे होते. दारू प्यायची म्हणून त्यांनी त्यावेळी एका वाईन शॉपमधून क्वार्टस, चकना आणि दोन ग्लास घेऊन म्हसोबा मंदिर येथून यड्राव पंचगंगा रस्त्यावरील ओढयानजीक असणाऱ्या सायझिंगच्या मागील बाजून असणाऱ्या मोकळया मैदानात आले. गेल्या दोन चार दिवसात पाऊस चांगला झाल्याने ओढयाला पाणी ही भरपूर होते. तेथेच बाजूला त्यांनी आपली बैठक बसविली. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांना काही दिसत नव्हते. पायवाटेने चुकून एकादा माणूस आला तर त्याची भेट होत होती. ओढयालगत ते दोघे दारू प्यायला बसले.दोन चार घोट घेतल्यावर सुरजने पैशाचा विषय काढला. तुझे पैसे देतो रे असे महादेव त्याला म्हणाला. माझे ही तू पैसे देणे लागतोस असे तो म्हणाला. दारूची नशा दोघांना चढली होती. दोघे ही नशेत बेधुंद असताना सुरजने महादेवच्या बायकोबाबत अपशब्द वापरला. याचा राग महादेवला आला. त्या दोघात चांगलीच भांडणे लागली. बघता बघता ते दोघे एकमेकाच्या अगांवर शिव्या देत जात होते. यातच महादेवने जवळच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि सुरजच्या डोक्यात घातला. त्यासरशी त्याच्या डोक्याला मोठी जखम होऊन रक्तस्त्राव होऊ लागल्याने सुरज हा खाली बसला. त्याच वेळी तोच दगड परत महोदव याने त्याच्या चेहऱ्यावर घातला. तसा तो ओरडत तडफडू लागला त्याच्या डोक्यातून आणि चेहऱ्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. आपल्या हातून सुरज मेल्याचे लक्षात येताच महादेवने त्याला ओढयाच्या पाण्यात ढकलून दिले. ओढयाला पाणी कमी असल्याने त्याचा मृतदेह तसाच पडला. ही घटना कोणाच्या लक्षात येण्या आधीच महादेव हा रस्त्याला आला आपली बाईक घेऊन तेथून तो पसार झाला. ओढया लगतच्या पायवाटेवरून जाणाऱ्या एका नागरिकाला ओढयाच्या पाण्यात एका तरूणाचा मृतदेह पडला असल्याचे दिसून आल्यावर त्याने या घटनेची माहिती जवळच्या नागरिकांना दिली. घटनास्थळी बघता बघता नागरिकांची गर्दी वाढली.त्यातील एका नागरिकाने या घटनेची माहिती शहापूर पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच घटस्थळी शहापूर पोलीसांनी धाव घेऊन घटनेची पाहणी केली. पोलीसांनी मयत तरूणाच्या खिशातील कागदपत्रावरून त्याची ओळख सुरज बबन कांबळे. रा.रेणुका झोपडपट्टी इचलकरंजी अशी पटविली. घटनास्थळी सुरज कांबळे याचे नातेवाईक ही आले. त्यांनी सुरजची ओळख पटविली. घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, उपाधिक्षक बी.बी महामुनी यांनी भेट दिली. शहापूर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेतील संशयीत आरोपीचा शोध घेत असताना या घटनेतील संशयीत आरोपी महादेव पोवार या स्वत:हून शिवाजी नगर पोलीस स्टेशनला संध्याकाळी हजर झाला. त्याने पोलीसांना घडलेल्या घटनेची माहिती देवून सुरज कांबळे याचा खून का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. सदरची घटना ही शहापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली असल्याने शिवाजीनगर पोलीसांनी त्याला शहापूर पोलीसांच्या ताब्यात दिले. या घटनेची लेखी फिर्याद मयत सुरज कांबळे याच्या मामाने शहापूर पोलीसात दिल्याने पोलीसांनी सुरज बबन कांबळे (वय २३) रा.रेणुका नगर झोपडपट्टी याच्या खून प्रकरणी महादेव पोवार रा.जवाहरनगर इचलकरंजी याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला इचलकरंजी येथील प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्याची रवानगी पाच दिवसाच्या पोलीस कस्टडीत केली होती. या घटनेचा तपास शहापूरचे स.पो.नी.अभिजीत पाटील, उप.निरी हिना शेख, अश्विनी वायचळ यांनी केला. या घटनेचा पुढील शहापूर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. सुरजचा खून हा खरोखरच महादेव याने आर्थिक कारणातून केला किंवा याला नाजूक संबाधाची किनार आहे हे पुढील तपासातूनच समजणार आहे.

## मुलींच्या छेडछाडीला त्याने विरोध...

अपमानास्पद वाटले. त्यांनी असरारला अपशब्द वापरून अपमानास्पद वागणूक दिली. असरार याचेही रक्त सळसळले. शाब्दिक वादावादीचं रूपांतर हाणामारीत झाले. असरार मणियार हा बेसावध आणि निःशस्त्र होता. संतापलेल्या सागर खैरनारने जवळ पडलेली सेंट्रींगच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारी, खिळ्यांनीयुक्त लाकडी फळी हातात घेतली व त्या फळीने असरारच्या डोक्यासह सर्वांगावर प्रहार सुरू केले. असरार हा आपल्या हातांनी सागरद्वारे होणारे प्रहार झेलण्याचा प्रयत्न करत होता. त्याचवेळी बांधकामासाठी वापरण्यात येणारी लोखंडी सळईने निलेश भदाणे याने असरार याच्यावर डोक्यात हाणली, तसेच त्याच्या सर्व शरीरावर मारहाण करण्यास सुरूवात केली. सागर आणि निलेश या दोघांच्या हल्ल्याने बेजार झालेला असरार जीवाच्या आकांताने जनावरासारखा ओरडू लागला. त्याचा आवाज ऐकून त्याचे वडील मुनाफ गफ्फार मणियार हे असरार याला हल्लेखोरांच्या तावडीतून सोडवण्यासाठी धावून आले. दरम्यान सागर आणि निलेश यांच्या मदतीला सागरचे वडील अनिल खैरनार, सहकारी सतिश जाधव आणि गोळ्या उर्फ योगेश नावाचा तरूण धावून आला. त्यांनी लोखंडी सळईने मुनाफ मणियार यांच्या मस्तकावर चौफेर वार केला. त्यात मुनाफ गंभीर जखमी झाले व रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळले. त्याच दरम्यान असरार हाही जायबंदी होवून रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर आडवा झाला. या हाणामारीने एकच गोंधळ सुरू झाला होता. हा आरडाओरडा ऐकून परिसरातील लोक गोळा झाले, तेंव्हा हल्लेखोर पाचही जणांनी घटनास्थळावरून पोबारा केला. दरम्यान निजामपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील यांना घटनेची खबर मिळताच ते आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी जैताने निजामपूर परिसरातील दोन समाजाचे मोठे गट आमने-सामने येवून धडकले होते. बाका प्रसंग लक्षात घेताच सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील यांनी घटनेची खबर पोलीस मुख्यालयात कळवली. दुसरीकडे गंभीर अवस्थेतील मुनाफ गफ्फार मणियार हा जागीच गतप्राण झाल्याने जमावात अधिक तणाव निर्माण झाला. प्रसंगावधान राखून सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील यांनी तात्काळ शीघ्रकृती दलाला पाचारण केले. जखमी अवस्थेतील असरार मणियार याला तात्काळ उपचारार्थ शासकीय रूग्णालयात पाठवण्याची व्यवस्था केली. शाहरूख शेख आणि अकिल शेख या तरूणांनी असरारला निजामपूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. मुनाफ मणियार यांच्या निधनाच्या वृत्ताने संतप्त जमावाचा एक गट हिंसक बनत असतांनाच जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय अधिकारी प्रदीप मैराळे, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, आझादनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंदराव कोकाटे, धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, दोंडायचा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी तथा साक्री, सिंदखेडा, सोनगीर पोलीस स्टेशनचे अधिकारी-कर्मचारी घटनास्थळी दाखल झाल्याने दोन संतप्त गटांवर नियंत्रण मिटवता आले. जिल्हा पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील यांनी समयसुचकता ठेवून प्रसंगावधान राखत जिल्हाभरातील पोलीस यंत्रणा घटनास्थळी संघटीत केल्याने पुढील अनर्थ टळला. मुनाफ गफार मणियार याचा हल्लेखोराच्या प्राणघातक हल्ल्यात मृत्यू झाल्याने समाजातील एक गट अति संतप्त होता. त्यांनी मुनाफचा मृतदेह सरळ निजामपूर पोलीस स्टेशनमध्ये आणून ठेवला. जोपर्यंत पाचही हल्लेखोरांना अटक करून त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करत नाही, तोपर्यंत मुनाफचा मृतदेह निजामपूर पोलीस स्टेशनमधून हलवणार नाही अशी ताठर भूमिका घेतली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी संयम राखत, शांततेने परिस्थिती हाताळली. गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्याचे ठोस आश्वासन दिले, त्यामुळे तणावग्रस्त समाज गट शांत झाला. अधिकाऱ्यांच्या शब्दाचा मान राखत अतिशय शोकाकुल वातावरणात चोख पोलीस बंदोबस्तात मुनाफ मणियार यांच्या मृतदेहावर दफनविधीचा संस्कार करण्यात आला. परिस्थिती निवळली होती तरी समाजकंटकांकरवी होणारा संभाव्य धोका लक्षात घेवून जिल्हा पोलीस प्रशासनाने जैताने व निजामपूर परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. शिबदे, साक्री तालुक्यासह जिल्ह्यात या घटनेचे पडसाद उमटू नये म्हणून खबरदारी घेण्यात आली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक जनतेच्या संपर्कात असले व जनतेचा विश्वास जिल्हा पोलीस प्रमुखांनी संपादन केला असला तरी गंभीर घटनेतही जिल्हा पोलीस प्रशासन परिस्थिती हाताळण्यात यशस्वी होते व परिस्थितीवर नियंत्रण ठेवता येते हे या गंभीर घटनेवरून दिसून आले..

जिल्हा पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी जनतेचा विश्वास संपादन केल्याने, दुर्दैवी घटनेवर त्वरीत उपाययोजना करता आली व जनतेचाही सहयोग मिळाला. दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील, आनंदराव कोकटे, सचिन देशमुख आदींनी युद्धपातळीवरून कारवाई करत संशयित आरोपी सागर अनिल खैरनार, मंगल उर्फ निलेश भदाणे, अनिल खैरनार, सतिश जाधव आणि गोळ्या उर्फ योगेश यांना रातोरात अटक करून गजाआड केले. शाहरूख शेख यांच्या फिर्यादीवरून निजामपूर पोलीस स्टेशनला उपरोक्त पाचही आरोपींच्या विरोधात भा.दं. वि. ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ३५४, ३५४ (अ) सह पोक्सो कायदा २०१२ चे कलम १२, १८ अन्वये गुन्हा दाखल केला.

# कंपनीकडून मागवलेल्या वस्तुंची हेराफेरी करणाऱ्या टोळीला अटक



**मुंबई/क्राईम रिपोर्टर**

मुंबई शहर व उपनगरात तोतया पोलिसांनी उच्छाद मांडला आहे. शहरातील जेष्ठ नागरिक, महिला यांना वेगवेगळ्या बहाण्याने फसवणूक केली जात आहे. असा प्रकार दहिसर मध्ये घडला. मात्र पोलिसांनी १०० गुन्हे दाखल असलेल्या एका तोतया पोलीसचे बिंग फोडून त्याला गजाआड करण्यात यश मिळवले. दहिसर पूर्व कडील शक्ती नगर येथील प्रभात सोसायटीमध्ये वैशाली गुजर या ७२ वर्षीय जेष्ठ महिला या आपल्या कुटूंबासह राहतात. २० सप्टेंबर रोजी त्या नेहमी प्रमाणे सकाळी ७च्या सुमारास दूध व फुले खरेदी करण्यासाठी घराबाहेर पडल्या. खरेदी झाल्यानंतर तासाभराने त्या घराच्या गेटजवळ आल्या. यावेळी एक अज्ञात व्यक्ती त्यांच्या जवळ आला. आणि तो वैशाली यांना म्हणाला, मावशी मी पोलीस आहे. मला तुमच्या शी काही तरी बोलायचे आहे. त्यामुळे तुम्ही माझ्या सोबत बाजूला चला. कशाला? काय काम आहे? तुम्ही काही घाबरु जाऊ नका. तुम्ही माझ्या सोबत बाजूला चला. असे म्हटल्यावर वैशाली गुजर या त्या व्यक्तीबरोबर काही अंतरावर बाजूला गेल्या. त्यांच्या सोसायटीच्या बाजुला पार्क युनिक नावाची सोसायटी आहे. त्या सोसायटीच्या गेट समोर आल्या असता, त्याठिकाणी आणखी तीन माणसे आलीत.त्यांना बघून वैशाली गुजर या घाबरून गेल्या. मावशी आम्ही पोलीस आहोत. घाबरून जायचे काही कारण नाही. जेष्ठ नागरिकांची सेवा करणे आमचे कर्तव्य आहे. यावेळी एका व्यक्तीने त्यांना त्या ठिकाणी एका महिलेचा खून झाला असून तुम्ही तुमचे दागिने काढून तुमच्याकडे असलेल्या बॅगमध्ये काढून ठेवा. आम्ही देखील आमचे दागिने काढून बॅगमध्ये ठेवतो असे सांगितले. त्यानंतर त्या जेष्ठ महिलेने आपल्या अंगावरील सर्व दागिने काढून त्यांच्या बॅगमध्ये ठेवले. ते दागिने बॅगमध्ये ठेवत असताना त्या व्यक्तींनी ते दागिने महिलेच्या हातामधून घेतले व त्यांच्या मधील दोन व्यक्तींनी त्यांना बोलण्यात गुंतवूण ठेवले . त्याचवेळी त्यांच्यामधील एका व्यक्तीने त्यांना दागिने त्यांच्या बॅगमध्ये ठेवले असे सांगितले. बॅगध्ये दागिने आहेत का? हे पाहत असताना ते चौघेही त्या ठिकाणाहून मोटारसायकल वर बसून पळून गेले. दिवसाढवळ्या आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, वैशाली गुजर या जेष्ठ महिलेने दहिसर पोलीस स्टेशन गाठून पोलिसांना घडलेली हकीगत सांगितली. पोलिसांनी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून दहिसर पोलीस ठाणे गु.र.क्र. १४४१/२२ कलम ४२०,१७०,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आणि या गुन्हयाचा तपास सुरू झाला. उत्तर प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त, विरेंद्र मिश्र, परिमंडळ-१२चे पोलीस उपायुक्त सोमनाथ घार्गे व सहाय्यक पोलीस आयुक्त वसंत पिंगळे दहिसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण पाटील यांनी घटनास्थळावर भेट देवून मार्गदर्शन केले, एका जेष्ठ नागरिक महिलेला दिवसाढवळ्या चोरट्यांनी लुबाळल्याने पोलीस ही चक्रावून गेले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि रणजित चव्हाण व पथक यांनी घटनास्थळ परिसरातील सुमारे ९ खाजगी इमारतीचें सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणांची पाहणी केली. यावेळी चार अनोळखी इसम कॅमेरात दिसून आले. त्यांनी दुचाकी व हेल्मेटचा वापर केल्याने त्यांचे वर्णन स्पष्टपणे दिसत नव्हते. मात्र गुन्हा करून जाताना त्यांचे मार्गावरील सीसीटीव्ही पडताळले असता, ते चौघेही दहिसर चेक नाका, काशिमीरा, घोडबंदर रोड, ठाणे कल्याण मार्गे आंबिवली येथे पळून गेले असल्याचे दिसून आले. गुन्हयाचे तपासादरम्यान दहिसर, बोरीवली, काशिमीरा, कासारवडवली, ठाणे येथील तब्बल ७८ ठिकाणचे सी सी टी व्ही फुटेजची तपासणी करून गुन्ह्यातील पाहिजे अनोळखी आरोपीचे फोटो प्राप्त करण्यात आले. सपोनि चव्हाण यांनी त्यांचे गोपनिय सुत्रांना या आरोपीतांचे फोटो पाठवुन त्यांच्या कडून गोपनिय माहिती प्राप्त करून यातील आरोपीची ओळख पटवली . आरोपी निश्चित झाल्यावर २६ सप्टेंबर रोजी गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि रणजित चव्हाण, सपोनि मल्हार थोरात, एटीसी पथकाचे पोउपनि रविराज कटटे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार, एटीसी पथकाचे अंमलदार, महिला अंमलदार यांनी गुन्ह्यातील संशयित आरोपी हैदर तेहजीब सय्यद (५५) यास आंबीवली रेल्वे स्टेशन परिसर, आंबीवल, ता.कल्याण, जि. ठाणे येथे जाऊन सापळा रचला असता यातील पाहिजे आरोपोत हा आंबीवली रेल्वे स्टेशन परिसर, आंबीवली प., येथे आला असता त्यास ताब्यात घेत असताना, तो पोलीसांशी झटापट करून पळुन जाण्याचा प्रयत्न करू लागला. त्यावेळी पोलीस पथकाने त्यास पकडले असता तो रस्त्यामध्ये झोपुन मोठयाने आरडाओरडा करून त्याचे नातेवाईक तसेच जवळचे महिला व्यक्तींना पोलीसांना विरोध करण्यासाठी आवाज देऊ लागला. त्यावेळी पोलीस पथकाने त्यास योग्य त्या बळाचा वापर करून त्यास ताब्यात घेवुन त्यास या गुन्हयात अटक करण्यात आली. गुन्हयाचे तपासादरम्यान हैदर सय्यद यांचे कडुन एकुण १ लाख ८० हजार रुपये कि च्या ६० ग्रमें वजनाच्या ४ बागडया हस्तगत करण्यात आल्या. हैदर सय्यद यांचा पुर्व इतिहास पाहता त्यांचेवर मुंबई, ठाणे तसेच महाराष्ट्रातील इतर शहारांमध्ये तोतया पोलीस बतावणी व फसवणूकीचे सुमारे १०० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे. ही कामगिरी उत्तर प्रादेशीक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त विरेन्द्र मिश्र,परिमंडळ -१२चे पोलीस उपायुक्त सोमनाथ घार्गे व सहाय्यक पोलीस आयुक्त वसंत पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली दहिसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय बांगर, सपोनि रणजित चव्हाण, सपोनि मल्हार थोरात, पोउपनि रविराज कटटे, पो.ह. संतोष परब, राजू नार्वेकर, देवेंद्र पांगे, प्रविण झेंडे, सिध्दार्थ किणी, पोना. निलेश सांबरेकर, सचिन केळजी, शहानवाज सय्यद, शैलेश किणी, पो.शि. भुपेंद्र सालकर, विनोद चितळकर, दिपक कोल्हा, अमर कांबळे, सुशांत जाधव, रोहन थापड़ मपोह. मार्टीना करडोजा यांनी सीसीटिव्हि फुटेजचे व गोपनिय माहितीचे आधारे उत्कृष्ठ प्रकारे वापर करून हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

## पोलिसांनी सापडलेली मतिमंद मुलगी पालकांच्या स्वाधीन!



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील वसुरी (खुर्द) येथे गुरुवारी (दि.७ ऑक्टोबर) येथील पोलीस पाटलांना सकाळी एक आठ वर्षाची मतिमंद मुलगी सापडली होती. तिला बोलता येत नसल्याने पोलीस पाटील यांनी या मुलीला वाडा पोलीस ठाण्यात नेऊन सोडले. येथील पोलीस अधिकरी व कर्मचाऱ्यांनी तिचा फोटो समाज माध्यमांवर फॉरवर्ड केला असता दिवसभर हा फोटो विविध ग्रुपवर पाहण्यास मिळत होता, शेवटी संध्याकाळी या फोटोंवरून तिची ओळख पटली असून ती खुपरी येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले.तिच्या पालकांचे नाव पत्ता मिळवून तिच्या पालकांना वाडा पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. दरम्यानच्या या मुलीला येथील महिला कॉन्स्टेबल रिना काकड यांनी सदर मुलीला चप्पल, ड्रेस व खाऊ घेऊन दिल्याने ही मुलगी खुश झालेली दिसली. या मुलीचे नाव उषा कुमारी असून तिला वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांच्या उपस्थितीत तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## जबरी चोरी आणि मोबाईल चैन स्नाचिंग करणाऱ्या दुक्कलीच्या मुसक्या आवळण्यात नारपोली पोलिसांना यश

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात जबरी चोरी सह मोबाईल व चैन स्नाचिंग च्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असताना गस्ती वरील पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोघा सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात नारपोली पोलिसांना यश मिळाले आहे. रशिद अब्बास शेख वय २७ व वसीम रशिद शेख वय २० दोघे रा. नवीवस्ती भिवंडी अशी अटक आरोपींची नावे आहेत.




पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावरील मानकोली नाका येथील उड्डाणपूला जवळ पडघा येथील टेम्पो चालक तसलिम इब्राहीम अंसारी हे आपला टेम्पो रस्त्या कडेला उभा करून आराम करीत असताना रात्री एक वाजताच्या सुमारास दोघा चोरट्यांनी त्यांच्या टेम्पोत शिरून तसलिम जवळील मोबाईल खेचून आपल्या दुचाकी वरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होते. टेम्पो चालक तसलिम याने त्यांच्या दुचाकीस मागील बाजूने पकडून ठेवल्याने त्यांच्यात झटपट होऊन दुचाकी वरील चोरटे खाली पडले. या गदारोळात नारपोली पोलीस ठाण्यातील महामार्गावरील गस्ती पथकातील पोलीस कर्मचारी बारेला व ठोंबरे हे त्याठिकाणी धावून येत त्यांनी दोघा आरोपींना ताब्यात घेत त्यांची दुचाकी व चार मोबाईल व एक चाकू असा ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून टेम्पो चालक तसलिम अन्सारी याच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल केला.

या प्रकरणी नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शना खाली सपोनिरी चेतन पाटील, प्रशांत आवारे, पोउपनिरी रोहन शेलार, पोहवा जयराम सातपुते, हरिष हाके, सुशिल इथापे, समीर ठाकरे, राजेश पाटील, लक्ष्मण सहारे, संदीप जाधव, सागर म्हात्रे, मनोज बारेला, जनार्दन बंडगर, ठोबरे या पथकाने आरोपीं कडे कसून चौकशी केली असता नारपोली पोलीस ठाणे हद्दीत ७ सप्टेंबर रोजी अंजुरफाटा ते कशेळी रस्त्यावर एकास लुबाडणूक करीत त्यावर चाकू हल्ला केल्याचा गुन्हा याच आरोपींनी केल्याचे उघड केले असून आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.

## सांगे गावातील ट्रान्सफार्मर चोरीचा प्रयत्न फसला

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यात चोरांचा सुळसुळाट झाला असून दररोज कुठेना कुठे चोरीच्या घटना घडत आहेत. शुक्रवारी रात्रीच्या सुमारास सांगे गावातील ट्रान्सफार्मर चोरण्याचा प्रयत्न करत असताना हा ट्रान्सफार्मर कठड्यावरून खाली पडला असावा तो चोरट्यांना उचलून नेता आला नसल्याने ट्रान्सफार्मर जागेवरच सोडून चोरट्यांना पळ काढावा लागला आहे. काठड्यावरून पडलेला ट्रान्सफार्मर नादुरुस्थ झाला आहे. त्यामुळे येथील परिसरातील वीज पुरवठा खंडीत झाला असल्याने हा ट्रान्सफार्मर त्वरित बदलण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.



## प्राचार्य फक्रोद्दिन बुदरे यांचा सेवानिवृत्तीबद्दल माता नर्गीस दत्त विद्यालयात सत्कार समारंभ!

**देवणी/प्रतिनिधी**

प्राचार्य फक्रोद्दिन बुदरे यांचा प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या बद्दल माता नर्गीस दत्त विद्यालयाच्या वतीने सपत्नीक भव्य दिव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी बांधकाम सभापती नागेश जिवने हे उपस्थीत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, माजी शिक्षण उपसंचालक खतीब, लातूर जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी नागेश मापारी लातूर जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा भारतबाई, सोळुंके, संस्थेचे सचिव शांतविरअप्पा कनाडे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे मॅडम, चेअरमन दगडु साळुंके, बोरी शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव जब्बार सगरे सर, निशीकांत मिरकल्ले, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, तानाजी पाटील, कुशावर्ता बेळे, न.प.बांधकाम सभापती अनिल इंगोले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे, युवा नेते गजानन भोपनीकर, मुख्याध्यापक धनराज चीद्रे, गदगेप्पा मानकरी, काशिनाथ गरीबे, बाबुराव इंगोले, किशोर निडवंचे, यांच्यासह विविध शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता, उपस्थित मान्यवरांची बुदरे यांच्या ३३ वर्षाच्या सेवानिृत्ती बद्दल सखोल असे मार्गदर्शन पर भाषणे केली, या कार्यकर्माचे सूत्रसंचलन आयुब पटेल यांनी केले तर आभार मनोज कनाडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माता नर्गीस दत्त शाळेचा संपूर्ण शिक्षकवृंद या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

## संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरात दांडिया रास कार्यक्रम उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी**

येथील अंबाजोगाई रोडवरील संगमेश्र्वर प्राथमिक विद्यामंदिरात नवरात्रौत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी दांडिया नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डी. एन. केंद्रे हे उपस्थित होते तर या प्रसंगी संस्थेचे सहसचिव राजेंद्र जायेभाये, मुख्याध्यापक अविनाश पवार, प्रा. कविता केंद्रे, सोनिया जायेभाये, अमित जायेभाये, शिवकांत वाडीकर, शिक्षक जी. बी. मोरे, डी. पी. दिवटे, डी. एस. भदभदे, जे. जी. कावळे, आर. व्ही. डुकरे, एन. आर. मुंडे, ए. व्ही. माने, अनिल वाघमारे यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्ज्वलन व सरस्वती स्त्रोताने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विज्ञान प्रदर्शनासह विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कोरिओग्राफर व्ही. एस. गंदगोने, ए. एस. जोशी, के. ए. पारडे, एस. ए. वानखेडे व त्यांच्या चमुने परिश्रम घेतले.



# थोडक्यात वृत्तांत

## प्राथमिक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे निवेदन

लातूर : राज्य शासकीय व जिल्हा परिषद कर्मचार्यांप्रमाणे खाजगी प्राथमिक शाळेतील लिपीक व सेवक पदावरील कर्मचार्यांना सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा (२४ वर्षाचा) लाभ मिळावा या मागणीचे निवेदन औसा मतदारसंघाचे आ.अभिमन्यू पवार यांना लातूर जिल्ह्यातील शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्यावतीने देण्यात आले. जिल्हा परिषद व शासकीय कार्यालयातील काम करणार्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांना हा लाभ दिला जातो परंतू त्याच संवर्गातील खाजगी प्राथमिक शाळेतील काम करणार्या लिपीक व सेवक यांना लाभ न मिळणे हा अन्याय आहे. तरी हा अन्याय आपण मा.उपमुख्यमंत्री व मा.शिक्षणमंत्री यांच्यासमोर मांडुन आम्हा लिपीक व सेवक यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी यावेळी शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्यावतीने आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडे करण्यात आली. या निवेदनासंदर्भात आपण प्रयत्न करू, न्याय मिळवून देवू असे आश्वासन आमदार अभिमन्यू पवार यांनी शिष्टमंडळास दिले आहे. हे निवेदन देण्यासाठी नागुरे एन.एस., रामदास साबणे, तुकाराम साबणे, महारूद्र कचरे, शामराव कुलकर्णी, बालाजी आकडे, रवि शिंदे, श्रीकृष्ण शिंदे, संतोष भस्मे, गिरीष बाचीपल्लीकर, तौफीन शेख, रमेश मिटकरी, फुटाणे पंडित इ.उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय जंतनाशक मोहिम

लातूर : राष्ट्रीय जंतनाशक मोहिम वर्षातून दोन वेळेस राबविण्यात येते या वर्षी हि मोहिम संपुर्ण लातूर शहरात दिनांक १० ऑक्टोरबर २०२२ रोजी १ ते १९ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना व १ ली ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या सर्व मुला-मुलींना शाळेमधून, महाविद्यालया मधून जंतनाशकाची गोळी देण्यात येणार आहे. व दिनांक १७ ऑक्टोनर २०२२ रोजी उर्वरीत लाभार्थ्यांना जंतनाशक गोळया देण्यासाठी मॉपअप दिनाचे आयोजन केले आहे.या मोहिमेत ०१ ते १९ वर्ष वयोगटातील लातूर शहरातील एकूण १०४८८७ लाभार्थ्यांना गोळया खाऊ घालण्याचे नियोजन केले आहे.तसेच शाळेत / महाविद्यालय व शाळा बाहय विदयार्थ्यांना आशा कार्यकती मार्फत घरभेटीतून गोळया खाऊ घालण्यात येणार आहेत. जंतामुळे ॲनेमिया,पोटदुखी, उलटया, अतिसार, मळमळ, भुक मंदावणे, कुपोषण थकवा व अस्वस्थता, आतडयात सुज येणे असे परिणाम बालकावर होतात.१ ते १९ वर्ष वयोगटातील मुला-मुलीमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक असते.आजार उदभवू नये म्हणून सदर मोहिमेचे आयोजन शासनाच्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे करण्यात आले आहे. तरी घरभेटीस येणा-या आशा कर्मचारी यांना या मोहिमेत सहकार्य करावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका,लातूरच्या वतीने करण्यात येत आहे.

## मुक्तेश्वर पडसलगे यांचे निधन



औसा : औसा येथील जिल्हा परिषद शिक्षक मुक्तेश्वर भीमाशंकर आप्पा पडसलगे यांचे शुक्रवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने पुणे येथील खाजगी दवाखान्यात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. दिवंगत मुक्तेश्वर पडसलगे यांनी केसरी या मित्र मंडळाची स्थापना करून सामाजिक कार्यात सक्रियता दाखवली तसेच महात्मा गांधी विचार मंचचे ते कार्यकर्ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी एक विवाहित मुलगी एक मुलगा नातू असा परिवार आहे त्यांच्या पार्थिवावर गुलमठ लिंगायत स्मशानभूमी औसा येथे शुक्रवारी सायंकाळी चारच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीसाठी शैक्षणिक सामाजिक राजकीय व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरासह नातेवाईक समाज बांधव व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्त्या



सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील सेवालाल नगर (ता. उत्तर सोलापूर) येथील सतरा वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास हा प्रकार घडला काजल पिंटू वडजे (वय १७ रा सेवालाल नगर ता उत्तर सोलापूर जि सोलापूर) असे त्या मृत मुलीचे नाव आहे. या घटनेची नोंद सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काजल वडजे हिने बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास आपल्या राहत्या घरी साडीच्या साह्याने छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार उघडकीस येताच कुटुंबीयांनी तिला उपचारासाठी सोलापूरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र ती उपचारापूर्वीच मत झाल्याचे डॉक्टरांनी संगितले. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस. एच. निंबाळकर करत आहेत. या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याची चर्चा आहे.

## महिलासाठी कर्करोग निदान सर्वेक्षण

लातूर : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे.या वर्षाचे औचित्य साधून मराठवाडा विभागातील नागरीकांना, सामाजीक, सांस्कृतीक,,शैक्षणीक व इतर समावेशक विकास होण्याच्या दृष्टीने आरोग्य, शिक्षण, कृषी, पाणीपुरवठा, स्वच्छता, पशुसंवर्धन, उर्जा व इतर विकास विषयक बाबींचा समावेश करुन आढळणारे कर्करोग (स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखाचा कर्करोग) निदानासाठी विशेष सर्वेक्षण मोहिम व कर्करोग निदान शिबीर महानगरपालिका स्तरावरुन आयोजीत करण्यात येणार आहे.लातूर जिल्हयामध्ये माहे ऑक्टोबर मध्ये लातूर शहर महानगरपालिका स्तरावर कर्करोग निदान शिबीराचे आयोजन करण्यायत येणार आहे.याची पुर्व तयारी म्हाणून प्रा.ना.आ.केंद्र स्तवरावर ३० वर्षा वरील सर्व महिलांसाठी दिनांक १० ऑक्टोकबर २०२२ ते २० ऑक्टोणबर २०२२ या कालावधीमध्ये आरोग्य कर्मचा-यामार्फत सर्वेक्षण करण्यात आहे. तरी घर भेटीस येणारे आरोग्य कर्मचारी यांना सहकार्य करावे. असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

10 TO 16 OCTOBER 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/8/2022 9:43 PM Page 1



# बिघडलेले रावण

भारतात आजकाल पॅरलल व्यवस्था निर्माण व्हायला लागल्या आहेत आणि त्यांच्यामुळे कायदा धाब्यावर बसवनाऱ्या धर्म संस्कृतीच्या ठेकेदारांचे फावले आहे. प्रत्येक गोष्टीकडे धर्माच्या चष्म्यातून बघायचे आणि लोकांना विनाकारण त्रास द्यायचा असे सध्या सुरू आहे. वास्तविक कोणतीही गोष्ट असो त्याची वैधता तपासण्यासाठी शासकीय यंत्रणा आहेत आणि त्या कायदेशीर आहेत असे असताना काही लोक धर्माच्या नावाखाली झुंडशाही करून जेंव्हा एखाद्या कलाकृतीला विरोध करतात तेंव्हा अशा लोकांचा सरकारने जर का बंदोबस्त केला नाही तर या देशात अराजकता माजेल. सध्या आदिपुरुष या चित्रपटाच्या विरोधात हिंदुत्ववाद्यांनी जो आवाज उठवला आहे, त्याला काहीही अर्थ नाही. सेन्सॉर बोर्डाने एकदाका एखादा चित्रपट पास करून त्याला यु किंवा ए सर्टिफिकेट दिले की त्या चित्रपटाला कुणीही कायदेशीर किंवा बेकायदेशीरपणे विरोध करू शकत नाही. कला संस्कृती ही कुणाची मक्तेदारी नाही आणि तिची कुठल्या एका धर्माशी बांधिलकी सुद्धा नाही. कारण कला संस्कृतीशी इमान राखून तिची सेवा करणारा कुठल्याही धर्माचा असो त्याच्यावर बंधने आणता येत नाहीत.

पण २०१४ पासून या देशात जे वातावरण तयार झालेलं आहे त्यात समाजाच्या विविध क्षेत्रातील चांगल्या आणि बदलत्या काळानुसार चालणाऱ्या लोकांची घुसमट होतेय. कला संस्कृती समाजाला जोडण्याचे काम करते. त्यामुळे कला संस्कृतीकडे कुणी जातीच्या किंवा धर्माच्या चष्म्यातून बघू नये. हे सगळ यासाठी सांगायचं आहे की सध्या आदिपुरुष या चित्रपटा वरून काही लोकांनी वाद निर्माण केलंय, काय तर म्हणे यात रावणाची भूमिका करणाऱ्या सैफ अली खान याचा लूक बरोबर नाही. शिवाय त्याला दाडी दाखवली आहे. हनुमंताच्या बाबतीतही तसाच आक्षेप आहे. एकीकडे आपण वाल्मिकी रामायण हे काल्पनिक आहे. असे मानतो आणि तसे असेल तर त्यातील व्यक्तिरेखा या सुद्धा काल्पनिक आहे. मग रावणाच्या लूक आणि दाढी बद्दल आक्षेप का? जे लोक रावणाच्या व्यक्तिरेखा बद्दल आक्षेप घेत आहेत त्यांनी रावणाला आणि हनुमानाला कधी पाहिले आहे का? आणि पाहिले नसेल तर रावण किंवा हनुमान दिसायला कसे होते त्यांना दाढी होती किंवा नव्हती हे त्यांना कसं ठाऊक? ज्या लोकांना आज रावणाच्या व्यक्तिरेखेचा पुळका आलंय ते रावणाचा पुतळा का जाळतात? म्हणजे कुठल्याही गोष्टीचा जाती धर्माशी संबंध जोडायचा आणि समाजात नवे नवे वाद निर्माण करायचे हे कुठे तरी थांबायला हवे. मुळात सेन्सॉर बोर्डाने पास केलेल्या सिनेमावर आक्षेप घेऊन वाद निर्माण करणेच चुकीचे आहे. पण सध्या देशात खाता न वही.. या एकाच विचाराने देश चाललेला असल्याने धर्माच्या ठेकेदारीला बळ मिळत चालले आहे आणि त्यातून समाजात दरी निर्माण होत आहे. एखाद्या पौराणिक कथेवर चित्रपट निघाला की कट्टरपंथी आक्रमक होतात. यापूर्वी जोधा अकबर, बाजीराव मस्तानी या चित्रपटांच्या विरोधातही धर्माच्या ठेकेदारांनी आकड तांडव केले होते. पण कशासाठी? चित्रपट म्हटलं की त्याकडे केवळ एक कलाकृती आणि त्यातून होणारे मनोरंजन याच भावनेतून पाहायचे असते. पण काही लोक त्यातून चुकीचा अर्थ काढतात आणि समजाची दिशाभूल करतात आताही आदिपुरुष चित्रपटाच्या बाबतीत तसेच केले जात आहे. धर्म आणि कला या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत आणि आज विज्ञान युगात धर्मातील जुनाट रूढी परंपरा कुणी मामित नाहीत तरी सुद्धा काही धर्माचे ठेकेदार आपण म्हणजे संपूर्ण हिंदू समाज आपण म्हणजेच सर्व मुस्लिम समाज असे समजून धर्माची ठेकेदारी चालवत आहेत आणि या लोकांमुळेच या देशात अशांतता पसरली आहे. चित्रपटात ज्या गोष्टी दाखवल्या जातात त्या सगळ्याच काही खऱ्या त्यामुळे त्यात जे काही दाखवले जाते त्याचा समाजावर वाईट परिणाम होतो असे मानणे चुकीचे आहे. कारण जे विचारवंत लोक आहेत ते सिनेमाकडे केवळ मनोरंजन म्हणून बघतात. कारण सिनेमातल्या सगळ्याच गोष्टी जार लोकांनी गांभीर्याने घेतल्या असत्या तर रामगड मधले सगळेच लोक गब्बरसिंग डाकू बनले असते. किंवा फायर सारखे सिनेमा पाहून समाजातील महिला लेस्बिन बनल्या असत्या धर्माच्या ठेकेदारांनी याच गोष्टी समजून घ्यायला हव्यात आणि ते समजून घ्यायला तयार नसतील तर सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून या धर्माच्या ठेकेदारंनी चालवलेल्या उच्छाद चां बंदोबस्त करायला हवा!

# सोशल मिडियाने घेतला मॉलीचा बळी!

## दिशायन

लंडनमध्ये राहणाऱ्या मॉली रसेल या १४ वर्षीय मुलीने आत्महत्या केली होती. तिच्या मृत्याचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्याने नुकताच या प्रकरणाचा अहवाल न्यायालयासमोर सादर केला. या संदर्भात निर्णय देताना न्यायलयाने मॉली रसेलच्या मृत्यूला सोशल मीडिया जबाबदार असल्याचे म्हटले आहे. न्यायालयाने सोशल मिडियाला का जबाबदार धरले आहे, ते आपण या लेखातून जाणून घेऊया.

लंडनमध्ये राहणाऱ्या मॉली रसेल या मुलीने १२व्या वर्षी तिच्या आई-वडिलांच्या परवानगीने इन्स्टाग्रामवर खाते उघडले होते. १३व्या वाढदिवासाला तिला आयफोनही भेट म्हणून मिळाला होता. मृत्यूच्या पूर्वी ती एका सामान्य मुलीसारखी वागत होती. मात्र, अचानक तिने आत्महत्येसारखे कठोर पाऊल उचलले होते. मॉलीच्या मृत्यूच्या दोन आठवड्यानंतर तिच्या वडिलांना, तिच्या मोबाईलमध्ये पीनट्रेस्टकडून आलेला एक ईमेल दिसला, ज्यात डिप्रेशन संदर्भातील पीन्स तुम्हाला आवडतील का?', असा उल्लेख होता. हा मेल पाहून त्यांनी तिचे इन्स्टाग्राम खाते तपासले. त्यात त्यांना 'अनइंम्पॉर्टंट थिंग्ज' नावाने एक फोल्डर सापडले. या फोल्डरमध्ये त्यांना आत्महत्येसंदर्भातील अनेक आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्या होत्या. तसेच एका फाईलमध्ये आत्महत्या करणाऱ्या मुलीवर कोण प्रेम करेल?' असे लिहिले होते. यावरुन त्यांना हे प्रकरण गंभीर वाटले, पुढे स्वतंत्र तपास अधिकाऱ्यांकडून या प्रकणाचा तपास सुरू केला गेला.

### सोशल मिडियाने प्रवृत्त केले

स्वतंत्र तपास यंत्रणांचे प्रमुख अँड्रयू वॉकर यांच्या अध्यतेखाली मॉली रसेल आत्महत्या प्रकरणाचा तपास करण्यात आला होता. आत्महत्येपूर्वी मॉली एका सामान्य मुलीसारखी वागत असली, तरी ती तणावात होती. तिने मृत्यूच्या सहा महिन्यांपूर्वी इन्स्टाग्रामवर १६ हजार ३०० पोस्ट लाईक केल्या होत्या, यापैकी २ हजार १०० पेक्षा जास्त पोस्ट या आत्महत्येसंदर्भातील होत्या. तसेच तिने पीनट्रेस्टवर आत्महत्येसंदर्भातील ४०० छायाचित्रांचे डिजिटल पीनबोर्डही तयार केले होते. इन्स्टाग्राम आणि पीनट्रेस्ट यांनी त्यांच्या अग्लोरिदमनुसार मॉलीच्या फीडवर असा मजकूर दाखलवला, ज्याची तिने कधीच मागणी केली नव्हती. याबरोबरच या कंपन्यांनी तिला प्रौढ युजर्ससाठी असलेला मजकूरही दाखवला. याचा तिच्यावर वाईट परिणाम झाला. यावरुन असे दिसून आले की एकंदरीतच ही आत्महत्या नव्हती, तर मॉलीला आत्महत्येसाठी सोशल मिडियाने प्रवृत्त केले.

हे प्रकरण न्यायालयात सुरु असताना, दोन्ही सोशल मीडिया कंपनींच्या प्रतिनिधींना न्यायालयात बोलावण्यात आले होते. यावेळी, पीनट्रेस्टच्या जडसन हॉफमनने यांनी मान्य केले की मॉलीच्या पीनट्रेस फीडवर अनावश्यक मजकूर दाखवण्यात आला. तसेच आम्ही हा मजकूर पूर्णपणे काढून टाकू, असेही ते म्हणाले. तर मेटा' कंपनीच्या अधिकारी एलिझाबेथ लागोन यांनीही मॉलीच्या फीडवर दाखवण्यात आलेल्या काही पोस्ट योग्य नव्हत्या, असे मान्य केले.

**सोशल मीडिया, पालकांसाठी आव्हानात्मक!**

मॉली रसेल आत्महत्या प्रकरण हे अतिशय गंभीर आहे, कारण आजवरच्या इतिहासात एखाद्या प्रकरणात सोशल मीडिया कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी न्यायालयात हजेरी लावणे, असे पहिल्यांदाच घडले आहे. द नॅशनल



सोसायटी फॉर द प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टू चिल्ड्रन'चे बाल सुरक्षा धोरण प्रमुख अँडी बरोज यांनी न्यायालयाच्या या निर्णयासंदर्भात बोलताना सोशल मीडिया आणि पालकांसाठी हा आव्हानात्मक काळ असल्याचे म्हटले आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुलांना धोकादायक मजकूर दाखवल्याचा आरोप होणे, ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी टीकटॉकला अमेरिकेतील दोन तरुण मुलींच्या मृत्यूसाठी जबाबदार धरण्यात आले होते. २०२१ मध्ये टीकटॉकच्या 'ब्लॅकआउट चॅलेंज'मध्ये भाग घेतल्यानंतर त्यांचा मृत्यू झाला होता. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुलांना जाणीवपूर्वक धोकादायक व्हिडिओ दाखवले जातात, असा आरोप यावेळी करण्यात आला होता.

मुलांना सोशल मिडियापासून दूर ठेवण्यासाठी सोशल मिडियाच्या वापरासंदर्भात नियम, कायदे बनवणे आवश्यक झाले आहे. कायद्याचा अंकुश आवश्यक आहे. जेणेकरून असे प्रसंग घडणार नाहीत. मुळात, सोशल मिडियाचा वापर बारा वर्षाखालील मुलांसाठी नसावा. आयडी प्रूफनेच लॉग इन करण्याची सोय केली, तर कोणीही खोटे वय सांगून सोशल मिडिया प्लॅटफऑर्मचा वापर करणार नाही.

१२ ते १८ वर्षापर्यतच्या मुलांसाठी सोशल मिडिया कंपन्यांनी त्यांच्या प्लॅटफॉर्मची सिस्टीम बदलणे गरजेचे आहे. अलगोरीदम, जाहिराती, सजेशन आदींवर अंकुश ठेवण्यासाठी वेगळी, स्वतंत्र यंत्रणा उभारावी. जेणेकरून असे प्रसंग पुन्हा उद्भवणार नाहीत. कंपनीच्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्सकडून कोणताही चुकीचा मजकूर वापरकर्त्याकडे जाणार नाही. समजा, १२ ते १८ वयोगटातील व्यक्ती असा कोणताही धोकादायक मजकूर बघण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याची परवानगी थेट नाकारली जावी अशी पद्धत करणे आवश्यक आहे.

पालकांनी, शिक्षकांनी मुले मोबाईलमध्ये काय पाहतात यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. त्यांच्या मोबाईल, लॅपटॉपचा बॅकअप, रिकव्हरी स्वत:कडे घ्यावे. त्यांच्या सिस्टिममध्ये मायनरची सेटींग करून घ्यावी. मुलांना इंटरनेटपासून काही काळ लांब ठेवण्यासाठी त्यांना फिरायला नेणे, त्यांच्यासोबत इतर खेळ खेळणे, त्यांच्यात विविध कलांची आवड जोपासली जावी यासाठी प्रयत्न करणे. शाळांनीही विविध उपक्रम राबवणे गरजेचे आहे, ज्यामुळे मुलांचा कल सोशल मिडियावरुन कमी होईल. सोशल मिडियाचा प्लॅटफॉर्मचा हा उमेदीचा काळ आहे, यात विविध आव्हाने समोर येतील. त्यावर विविध उपाय काढूनच पुढे ही माध्यमे टिकणार आहेत.

# भारतातून गोरे इंग्रज गेले, काळे इंग्रज आले!



भारत देश १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य झाल्या नंतर २६ जानेवारी १९५० च्या गणराज्य दिनाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेले संविधान देशाला अर्पण झाले. जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ व कायदे तज्ञांनी लिहून ठेवलेले संविधान किमान काही वर्ष तरी या देशातील सत्ताधीशांनी जसेच्या तसे कां लागू केले नाही? घटना समितीने देशाला लागू केलेल्या संविधानाचे परिणाम बघून ते नंतर पुढील टप्प्यात घटना दुरुस्ती करणे गरजेचे होते. संविधान योग्य होते, म्हणूनच ते घटना समितीने स्वीकारले होते ना? मग फक्त दीड वर्षाच्या आत संविधानातील काही कलम बदलण्याचे कारण काय? हा फार मोठा गंभीर प्रश्न आजही जनतेसमोर अनुत्तरीय आहे? आणि त्या व्यवस्थेतूनच औद्योगिकरणाच्या प्रवाहात, शहरी विकासाच्या नावावर शेतकरी, शेतमजुराची प्रचंड लूट केली, हे सुध्दा सत्य नाकारता येत नाही. मग या स्वतंत्र देशातील निवडणुकी होण्या अगोदरच १८ जून १९५१ ला पंडित जवाहरलाल नेहरू हे हंगामी सभापती असताना पहिली घटना दुरुस्ती करून शेतकरी विरोधी दीडशे कायदे तयार झाले, ही बाब फक्त मंत्रिमंडळाच्या अक्त्यारीत कशी काय ठेवली? व केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अक्त्यारित असल्यामुळे आर्थिक धोरणाशी हा प्रश्न संबंधित असल्याने तो निर्णयच मंत्रीमंडळाने घ्यावा यावर सुप्रीम कोर्ट सुद्धा निकाल देणार नाही, अशी तरतूद सुद्धा करून ठेवली. हा जर प्रश्न सुप्रीम कोर्टाच्या आवाक्याच्या बाहेरचा असेल तर ती लोकशाही कशी? शेतकऱ्यांची कोंडी करून मारायचे, ही शेतकरी शेतमजुरांची जीवघेणी व्यवस्था कॉंग्रेसचच्याच काळात सुरू झाली ना? म्हणजेच या कुटीलनीतीचे सूत्रधारच पंडित जवाहरलाल नेहरूजीचे मंत्री मंडळच होते. हे आता, होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरून स्पष्ट झाले. आणि त्या व्यवस्थेलाच कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना व बीजेपी या राजकीय पक्षांनी गेल्या ७५ वर्षापासून खतपाणी घातले? व ते तसेच कायदे व धोरणे आतापर्यंत राबविले. निवडणुकी होऊन पहिली लोकराज्य स्थापना सन १९५२ मध्ये झाली. व तत्कालीन कॉंग्रेस सरकारने सन १९५५ मध्ये जीवनावश्यक वस्तू कायद्यात शेतकऱ्यांची पिके घेऊन त्यावर बंधने आणली. शेतकरी ,शेतमजूर व जनतेनी यांच्यावर विश्वास ठेवून हे सरकार कधी तरी धोरणात व कायद्यात बदल घडवतील व आपल्याला चांगले दिवस येतील, या कोरड्याआशेने आतापर्यंत वाट पाहत होता व झालेला अन्याय नीमुटपणे शेतकरी व शेतमजूर समुदाय हा सहन करीत राहिले . कारण या देशात चालणाऱ्या आर्थिक धोरणाचा अभ्यास सामान्य शेतकरी व जनतेला नव्हता.मात्र या चुकीच्या व्यवस्थेत शेतकरी, शेतमजूर, निरपराध जनता भरडल्या गेली, हे मोठे घबाड वास्तव समोर आले आहे. व त्याचा परिणाम शेतकरी आत्महत्तेत होत गेला. आणि त्यामुळे भारत देशाला सर्वाधिक शेतकरी आत्महत्येचा कलंक लागला, हे भयान वास्तव संपूर्ण जगासमोर उघड झाले.

ग्रामीण व्यवस्थेच्या विचाराचे डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी, तुकडोजी महाराज, क्रांतिसिंह नाना पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख ही मंडळी शासनाचा धिक्कार करून व्यवस्थेच्या बाहेर पडले. व काहींनी राजीनामे दिले. पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संसदेत पोहोचू नये अशी व्यवस्था केली गेली. म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना कॉंग्रेसचा वीचार सोडून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्ष स्थापन करावा लागला? डॉ.आंबेडकर यांनी सर्वसमावेशक संविधान लिहिल्यानंतर दुसरा पर्यायी पक्ष स्थापन करणेची गरज निर्माण कां झाली होती? तर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ग्रामीण व्यवस्थेवर केलेला शोषण हल्ला हाच कारणीभूत ठरला. (कॉंग्रेस सरकारने चुकीचे धोरणे व शेतकऱ्यांवर, व पर्यायाने मजुरावर लादलेले कायदे हे पुन्हा दुरुस्त करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी आर.पी.आय. पक्ष स्थापन केला होता काय? अशी शंका जनतेच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. परंतु कालांतराने आर.पी.आय. सुद्धा धर्मनिरपेक्ष च्या नावावर कॉंग्रेसलाच बळी पडली. डॉक्टर बाबासाहेबानी ज्याच्याविरुद्ध बंड उभारले त्यांनाच आंबेडकरी नेते व ही गरीब जनता बळी पडली काय? ही वस्तुस्थिती मात्र आजही दिसत आहे) म्हणूनच डॉ.आंबेडकर कॉंग्रेसला नेहमी जळते घर म्हणायचे.

औद्योगिकी करणाच्या झपाट्यात शहरीकरण वाढले. एकट्या मुंबई व ठाणे शहरात साठ आमदार आहेत, व संपूर्ण विदर्भात ६२ आमदार आहेत. क्षेत्रफळ मुंबई, ठाणेचे कमी व आमदाराची संख्या जास्त. विदर्भाचे क्षेत्रफळ मोठे व मात्र आमदाराची संख्या कमी आहे. कारण हा सर्व लोकसंख्या व्यवस्थेवर आधारित कारभार आहे. त्यामुळे विधान भवनात, लोकसभेत निर्णय शहरीकरणाच्या बाजूने होणें सुरू झाले. शेतकरी शेतमजूर व कामगारांनी कष्ट करून जमा केलेली तिजोरी, सत्ताधीशांनी पळवून स्विस बँकेत गेली. सत्ताधीशांनीआमदार खासदारांच्या दलाली मार्फत कष्टकरी जनतेला मरण यातना देऊन लुटले. एवढ्या मरण यातना देऊन झाल्यावर सुद्धा, व प्रचंड प्रमाणात आत्महत्या घडवून सुध्दा हा देश राज्यकर्त्यांनी शहरी विकासाच्या नावावर कर्ज बाजारी केला. आणि या देशावर आत्महत्येचे व कर्जबाजारी पणाचे असे दुहेरी गंभीर संकट आणले. यालाच शरद जोशी म्हणायचे इंडिया विरुद्ध भारतची लढाई सुरू झाली. कॉंग्रेसने जोपासलेली परंपरा राष्ट्रवादी, शिवसेना व बीजेपी या राजकीय पक्षांनी आतापर्यंत तशीच चालू ठेवली. या सर्व पक्षांना निवडून देण्यासाठी मतदार व जनता सुद्धा तेवढीच जबाबदार आहे. कारण अडाणी व अशिक्षित जनतेला एवढे पुरेसे ज्ञान नव्हते. जे ज्ञान अजून पर्यत च.इ., किंवा M.com.चे विद्यार्थ्यांना सुद्धा पूर्णपणे कळत नाही. तर शेतकऱ्यांचा त्यात काय दोष आहे? ती शासनाची केंद्र व राज्याची जबाबदारी आहे. परंतु हिंदूंची मते घेऊन हिंदूंच्या नावावर राज्य सुरू झाले व ज्यांना कळत नाही साधारण बुद्धिमत्तेची माणसे आमदार खासदार बनविले गेले. या पान टपरी वाले, ड्रायव्हर, गुंडे, बदमाशांचे, शासनाची तिजोरी लुटून राज्यकारभार सुरू झाला. नाहीतर तो त्या पद्धतीने जाणीवपूर्वक केल्या गेला. शेतकरी हिताचे कायदे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. औद्योगिकीकरणाच्या प्रगतीच्या वाटचालीत शेतकरी आत्महत्या वाढायला लागल्या? आणि ही चुकीची परंपरा जनतेनीच नाकारून, आता पुन्हा नव्याने आर्थिक धोरणाच्या पक्षाला मतदान करावे लागेल. शेतकरी संघटनेची विचार धारा व शरद जोशींचे तत्त्वज्ञान जोपर्यंत हा देश स्वीकारणार नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच राहील. त्या थांबणार नाहीत? व अमेरिकेतील डॉलर च्या मानाने भारतीय रुपयाचे झालेले अवमूल्यन सुध्दा दुरुस्त होणार नाही. जो शेतीमाल पिकवतो, त्याला तुम्ही उत्पादक म्हणतात, आणि त्याने उत्पादन केलेल्या मालाला जर तो भाव मागित असेल तर तो शेतकरी शासनाच्या व कायद्याच्या भाषेत गुन्हेगार होतो, त्याला लाठी मार अश्रुदुराच्या नळकांडे व कोर्ट केसेस दाखल करून त्याला जैलात टाकल्या जाते. म्हणजेच तू फक्त शेती माल पिकवून या देशाला पोसण्याची जबाबदारी फक्त तुझ्यावर आहे, मात्र तुझ्या कुटुंबाची अवहेलना होत असेल आणि तू जर शेतीमालाला मागण्यासाठी रस्त्यावर आंदोलन करत असेल तर तू मात्र कायद्याच्या स्वरूपात गुन्हेगार आहे. शेतीमालाच्या उत्पादकाला गुन्हेगाराची सजा भोगणारी ही भारत देशातील कोणती परंपरा आहे, शेतीमालाचे उत्पादन वाढवावे पण तू शेतीमालाला भाव मागू नये असे जर कायदे या देशात असेल तर तो शेतकरी कसा समृध्द होईल? म्हणून शेतकरी हा गेल्या ७५ वर्षात स्वातंत्र्य मिळून सुद्धा पारतंत्र्यात आहे. शेतकऱ्यांचे जीवन सुधारल्याशिवाय शेतकरी आत्महत्येचा कलंक मिटणार नाही. आणि हे कायदे फक्त शेतकरी संघटनेचे ध्येयवादी कार्यकर्तेच आता पुन्हा दुरुस्त करू शकतील? त्यासाठी आता शेतकरी संघटनेला अ. भा.गुरुदेव सेवा मंडळ + वारकरी संप्रदाय महामंडळ,+ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे काही गट , या सर्वांना एकत्रपणे शेतकरी आर्थिक स्वातंत्र्याच्या लढाईचा झेंडा हाती घेऊन लढावे लागेलं, तेव्हाच खऱ्या अर्थाने जुन्या राजकीय पक्षांना मुठ माती देऊन नवीन स्वतंत्रवादी व्यवस्था तयार होईल. ना हिंदू खत्रे मे, ना मुस्लिम खतरे मे, सच्चाई तो ये है की, इस देश का किसान खतरे मे है.



**लेखक : धनंजय पाटील काकडे, कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र (९८९०३६८०५८)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# झेडपीच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नेमली समिती

## पालकमंत्री विखे-पाटील यांच्या आदेशाची अमंलबजावणी!





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या सभेत आमदारानी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील टेंडरच्या गडबडीबाबत प्रश्न उपस्थित केल्यावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी चौकशी समिती गठीत केली आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांच्या अखत्यारीत झालेल्या जल जीवन मिशन योजनेतील निविदा प्रक्रीयेची चौकशी करण्याकरीता समिती गठीत करणेबाबत जिल्हाधिकारी शंभरकर यांनी हे आदेश काढले आहेत. ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केलेल्या ठरावानुसार मी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती असे आदेशीत करतो की. कार्यकारी अभियंता दिपक कोळी यांच्या अखत्यारीत झालेल्या जल जीवन मिशन योजनेतील निविदा प्रक्रीयेची चौकशी करण्याकरिता खालीलप्रमाणे चौकशी समिती गठित करण्यात येत आहे. चौकशी समितीचे अध्यक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी हे अध्यक्ष असतील तर मृद व जलसंधारण कार्यकारी अभियंता अ.प.कदम, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सदाशिव शेळके हे सदस्य तर स्थानिक निधीचे लेखाधिकारी सरताज शेख हे सदस्य सचिव असतील. या आदेशान्वये गठीत चौकशी समितीला आदेशित करण्यात येते की चौकशी समितीने १५ दिवसाच्या आत सदर प्रकरणाची प्रत्यक्ष तपासणी करून परीपूर्ण अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. चौकशी समितीने निष्पक्षपातीपणे व कोणत्याही दबावाला बळी न पड़ता अहवाल तयार करावा. चौकशी समितीने पारदर्शकपणे चौकशी करावी. चौकशी समितीने आवश्यक त्या ठिकाणी अधिकारी, कर्मचारी यांना चौकशीसाठी उपस्थित राहण्यासाठी सांगितल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. चौकशी समितीला आवश्यक ते सहकार्य मिळेल याची खातरजमा करण्याची जबाबदारी विभागप्रमुखाची राहील. सर्व कागदपत्रांची तपासणी करून दस्तावेज आढळल्यास त्यांच्या सत्यपनी करणे, समितीने प्रत्यक्षदर्शी तथ्य तपासून सादर दस्तावेज, पुरावे यांच्याआधारे अंतिम निष्कर्ष काढून आपला स्पष्ट अभिप्राय अहवाल तयार करून सादर करावा, असे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी काढलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# महिलेच्या हत्येतील आरोपीला भिवंडी पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील कणेरी परिसरात एक ऑक्टोबर रोजी झालेल्या महिलेच्या हत्येतील आरोपीस पकडण्यात भिवंडी गुन्हे शाखेस यश मिळाले आहे .मोनिश दिलीप जाधव वय १९ रा.कवाड ता.भिवंडी असे अटक आरोपीचे नाव आहे. एक ऑक्टोबर रोजी भिवंडी महानगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत महिला सविता शिवराम साळवे वय ४२ रा. बौध्दवाडा, कणेरी ही कामावरून घरी आली असता तिने घराचा दरवाजा उघडताच मागील बाजूकडील खिडकीतुन घरात प्रवेश करून लपुन बसलेल्या अज्ञात आरोपीने तिच्या गळ्यावर हातावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करून पसार झाला होता. याप्रकरणी हत्येचा गुन्हा शहर पोलीस ठाण्यात दाखल असताना याचा तपास शहर पोलिसांसोबत गुन्हे शाखा भिवंडी समांतर करीत होते. गुन्हे शाखा भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वा खाली सपोनि धनराज केदार, विजय मोरे, सपोनि प्रफुल्ल जाधव, पोउपनिरी रमेश शिंगे, सपोउपनि रविंद्र पाटील, राजेंद्र चौधरी, रामचंद्र जाधव, पोलीस कर्मचारी सचिन जाधव, सचिन सोनवणे, नरसिंह क्षीरसागर, भावेश घरत, प्रशांत बर्वे, रविंद्र साळुंखे या पोलीस पथकाने अज्ञात हत्या करणाऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील तब्बल ७५ ठिकाणी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासात असतानाच तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारां मार्फत मिळालेल्या माहितीनुसार संशयित मोनिश दिलीप जाधव यास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने हत्या केल्याची कबुली दिलेली आहे. आरोपीस भिवंडी शहर पोलीसांच्या ताब्यात दिल्या नंतर न्यायालयात हजर केले असता त्यास पोलीस कोठडी सुनावली आहे.

**हत्येचे कारण अजून ही अस्पष्ट?**

हत्या झालेली महिला सविता साळवे ही घटस्फोटीत आहे. त्यामुळे अनैतिक संबंधातून हत्या झाल्याचा कयास वर्तविण्यात येत असताना हत्या करणारा आरोपी हा अवघा १९ वर्षाचा युवक असल्याने त्याने हत्या करण्या मागे नक्की कोणते कारण आहे हे अजून ही स्पष्ट झाले नसल्याने पोलीस त्या दिशेने चौकशी करून यामध्ये अजून कोणाचा सहभाग आहे का? याचा तपास गुन्हे शाखा करीत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांनी दिली आहे.

# २० पटसंख्या खालील शाळा बंदचा निर्णय रद्द करा; देवणी तहसीलदार यांना गोर सेनेची निवेदनाद्वारे मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

राज्य शासनाने जिल्हा परिषद शाळेतील २० पटसंख्येखालील शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करावा अशी मागणी गोर सेनेच्या वतीने शुक्रवार दि.७ सप्टेंबर रोजी देवणी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षण विभागाच्या वतीने राज्यतील जिल्हा परिषदेच्या ० ते २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या सर्व शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार हालचाली सुरू केल्या आहेत. या निर्णयामुळे तांडा वस्ती व वाड्यावरील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी शिक्षण विभागाने सदरील निर्णय थांबवले नाही तर गोर सेना राष्ट्रीय अध्यक्ष प्राध्यापक संदेश चव्हाण व प्रदेश अध्यक्ष प्राध्यापक संपत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे निवेदनावर देवणी तालुका गोर सेना अध्यक्ष पंडित पवार, उपाध्यक्ष राहूल चव्हाण, सचिव उमाकांत पवार, बालाजी पवार, अनिल चव्हाण, देविदास राठोड, विनायक चव्हाण, प्रकाश राठोड यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यामुळे निर्णय थांबले नाही तर राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल असे सांगितले.

# आपल्या देशातील लोकांना अजूनही वेळ नेमका कुठे घालवावा कळत नाही हेच खरे दुर्दैव-अरविंद जगताप




**लातूर/प्रतिनिधी**

आपल्या देशातील सर्वसामान्य लोकांना स्वातंत्र्याच्या सात दशकानंतरही आपला अमूल्य वेळ, कुठे, कसा घालवावा हे काळात नाही. वास्तविक पाहता हेच आपल्या देशाचे खरे दुर्दैव असल्याची खंत ख्यातनाम लेखक-दिग्दर्शक अरविंद जगताप यांनी व्यक्त केली. लातूर येथील पूर्णानंद सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शारदोत्सव व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प 'चला हवा येऊ द्या' फेम लेखक - दिग्दर्शक अरविंद जगताप यांनी 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' या विषयावर गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्याख्यानमालेचे सचिव प्रकाश घादगिने हे होते. या व्याख्यानाचे प्रायोजक बन्सल क्लासेस प्रा. लि. लातूर, उस्मानाबाद जनता सहकारी बँक, लि. लातूर व लातूर मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी लातूर हे होते. आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात अरविंद जगताप यांनी छोट्या - छोट्या गोष्टींना आपण रोजच्या धावपळीमध्ये फारसे महत्व देत नाही, त्याकडे सहजगत्या दुर्लक्ष्य करतो, मात्र त्याच गोष्टी फार काही शिकवून जातात, असे सांगितले. अशा अनेक छोट्या गोष्टींची त्यांनी उदाहरणेही प्रस्तुत केली. मुंबईतील प्रत्येक अपार्टमेंटला रीतसर परवानगी घेऊन प्रत्येक फ्लॅटमध्ये जाऊन तेथील टॉयलेट - बाथरूम, बेसिनच्या नळांची सूक्ष्म पाहणी करून लिकेज आढळल्यास स्वतः सोबत नेलेल्या प्लम्बरकडून ते तात्काळ दुरुस्त करून देणाऱ्या अमित जोगी नामक अवलियाची गोष्ट त्यांनी सांगितली. असे करताना ते कोणत्याही प्रकारच्या प्रसिद्धीची अपेक्षा बाळगत नाहीत. आठवड्यातून दोन दिवस ते या उपक्रमाला देतात. हे काम जरी छोटे वाटत असले तरी त्यांनी आतापर्यंत एका धरणात साठवले जाऊ शकेल एवढे पाणी वाचवल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. हे काम किती छोटे दिसत असले तरी असामान्य आहे, याची सत्यता पटवून दिली. माकडाचा खेळ करणारा मदारी आणि कार्यकर्त्यांना वापरून घेणारा राजकीय पक्षाचा नेता यांच्याविषयीची एक छोटी गोष्टही जगताप यांनी सांगितली. आपले पोट भरणाऱ्या माकडाला खेळ झाल्यावर मदारी डोक्यावर उचलून दुसरीकडे नेतो. राजकारणी मात्र आपल्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या कार्यकर्त्यांना आपल्या घराच्या आतही घेत नाही. यावरून आपण कोणाशी, कधी कसे वागावे याचा धडा मिळतो, पण लोकांना ते कळत नाही. आपल्या देशात आजपर्यंत एकही राजकीय पक्षाच्या सभेत सामान्य नागरिकांच्या प्रश्नावर चर्चा, भाष्य झाल्याचे दिसून येत नाही. तरीही लोक आपली सारी कामे सोडून सभेला गर्दी करतात. त्यावर आपला वेळ खर्ची घालून विनाकारण चर्चा करतात. त्यामुळे साध्य होते तरी काय? ही गोष्ट अजूनही आपल्या लोकांच्या लक्षात येत नाही, हेच खरे देशाचे दुर्दैव असल्याचे त्यांनी नमूद केले. छोट्या छोट्या गोष्टीतून उपाय काढणे म्हणजेच गोष्ट छोटी डोंगराएवढी असते, असे त्यांनी बोलून दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अब्दुल गालिब शेख यांनी तर आभार प्रदर्शन आदित्य कुलकर्णी यांनी केले.

# लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील हैदराबाद मुक्तिसंग्राम लढा ग्रंथ आणि पोस्टर प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर (पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग) आणि कुमारस्वामी महाविद्यालय, औसा यांच्या संयुक्त विद्यमाने हैदराबाद मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक पोस्टर्स व ग्रंथप्रदर्शनास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड आणि उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले यावेळी आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, आयोजक इतिहास विभागप्रमुख डॉ.सदाशिव दंदे, इतिहास विभागप्रमुख डॉ.सुनिल पुरी, हैदराबाद मुक्तिसंग्राम अमृत महोत्सव समितीचे समन्वयक डॉ.संजय गवई, मराठी विभागप्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे, स्टाफ सचिव प्रा.रवींद्र सुरवसे, डॉ.गुणवंत बिरादार, डॉ.किरण ओटले, प्रा.शंकर भोसले, ग्रंथालय प्रमुख मधुकर निकुंबे आणि विरेश कोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड म्हणाले की, हैदराबाद मुक्तिसंग्राम लढा हा हिंदू आणि मुस्लीम विरोधी लढा नव्हता तर तो मानवमुक्तीचा लढा होता. त्यामुळे या ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सोबत लातूर शहरातील इतिहास संशोधक, अभ्यासक आणि इतिहास प्रेमींनी या प्रदर्शनाला अवश्य भेट देऊन माहिती घ्यावी असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

यावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे म्हणाले की, हैदराबाद मुक्तिसंग्राम लढा हा संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी लढा होता. यामध्ये मराठवाड्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्या सर्वांची माहिती व्हावी या उद्देशाने हे प्रदर्शन आयोजित केल्याचे ते म्हणाले. या प्रदर्शनामध्ये हैदराबाद फ्रीडम स्ट्रगल, काळाच्या पडद्याआड, कहानी हैदराबाद लढ्याची, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, द लास्ट निजाम, हैदराबाद गॅझेटियर, हैदराबाद संस्थानाचा इतिहास यासोबत विविध फर्मान, तत्कालीन वर्तमान वर्तमानपत्रात प्रकाशित झालेली विविध लेख आणि बातम्या यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सदाशिव दंदे यांनी केले. तर प्रास्ताविक डॉ.सुनील पुरी यांनी केले आणि आभार डॉ.संजय गवई यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भीमाशंकर सुगरे, शेख गौस, ज्ञानेश्वर जमादार, भंगिरे महेश यांच्यासह इतिहास विभागातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेऊरमध्ये चार तलवारीसह एका तरुणास अटक



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथे १६ हजारांच्या चार धारदार तलवारी विक्री केल्याप्रकरणी एका तरुणास तलवारीसह पोलिसांनी अटक केली असून त्यास न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. बमनिंग पंचप्पा बमगोंडा (वय २७) असे अटक करण्यात आलेल्या संशयीत आरोपीचे नाव आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी नवरात्र महोत्सवाच्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यावर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अक्कलकोट उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंग गौर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांनी विविध पथके नेमून अशा इसमांची माहिती काढून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना केल्या पोलीस पथकाने जेऊर येथे बाजारात गस्त घालत असताना संशयित आरोपी बनवून दा याने विक्रीसाठी धारदार तलवारी आणल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्यानुसार पथकाने सापळा रचून त्याला अटक केली. ही सदरची कारवाई पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे, पोलीस उपनिरीक्षक रेवणसिद्ध काळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल अजय भोसले, पोलीस नाईक अल्ताफ शेख, सुभाष दासरे, नबिलाल मियावाले, पोलीस कॉन्स्टेबल महादेव शिंदे आदींनी कारवाई केली आहे.

# सांगलीत महिलेची ५० हजार रुपयांची फसवणूक

सांगली : फोटो व घामाचे कपडे घेउन करणी करून जिवीताला धोका पोहचविण्याचा प्रयत्न एका मांत्रिकाने केला असल्याची तक्रार एका लॉण्ड्री व्यावसायिकाने मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली आहे.याबाबत माहिती अशी, श्रीप्रसाद राक्षे (वय ३५ रा. तासगाव) यांची पत्नी अस्मिता ही हातकणंगले येथे वास्तव्यास आहे. ती सुभाषनगर (ता.मिरज) येथील मांत्रिक सलीम मुल्ला याच्या संपर्कामध्ये आली. यावेळी मांत्रिकाने २२ मार्च ते ३० मे २०२२ या दरम्यान, पत्नीकडून घरातील व्यक्तींचे फोटो व घामाने भिजलेले कपडे, पायमोजे, रूमाल याची मागणी केली. पत्नीला अंगारा देउन याद्वारे आपण करणी, भानामती करून सासरच्या मंडळींना योग्य मार्गावर आणू शकतो असा विश्वास दिला. यासाठी त्यांने श्रीप्रसाद राक्षे यांच्या पत्नीकडून ५० हजार रूपयेही उकळले आहेत. या प्रकरणी मांत्रिक मुल्ला याच्याविरूध्द ग्रामीण पोलीस ठाण्यात फसवणुकीसह अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धनेगाव येथील महादेव विद्यालयात तालुकास्तरीय युवा महोत्सव संपन्न




**देवणी/प्रतिनिधी**

महादेव कनिष्ठ महाविद्यालय धनेगाव येथे तालुकास्तरीय युवा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन देवणी येथील नेहरू युवा केंद्राचे समन्वयक प्रणव बिरादार व परमेश्वर बिरादार यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी चित्रकला स्पर्धा, भाषण स्पर्धा व तसेच विविध प्रकारच्या अश्या अनेक तालुकास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात नेहरू युवा मंडळ धनेगाव यांच्या वतीने विद्यालयास क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य रामलिंग मुळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नेहरू युवा मंडळ जवळगा येथील अध्यक्ष तथा युवक कॉंग्रेसचे जिल्हा सचिव सूरज मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. धनेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे नुतन चेरमन संगाप्पा चरपले, व्हॉईस चेअरमण अमर बिरादार आदी उपस्थित होते.

10 TO 16 OCTOBER 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/8/2022 9:44 PM Page 1



पान १ वरून...

## भांडण सोडवायला जाऊन तो ...

शुल्लक वादातून प्रकाश झा या तरुणावर त्याच भागातील निलेश माळी, गुड्डू माळी, अक्षय गिरी आणि अन्य तिघांनी हल्ला केला, त्याला मारहाण होत असताना ती सोडवण्यासाठी वैजनाथ शर्मा, नित्यानंद शर्मा आणि विकास झा हे धावले. पण हल्लेखोरांनी त्यांच्यावरही लाकडी दांडके आणि लोखंडी पहारीने हल्ला केला. यात तिघेही जखमी झाले. त्यांना संजीवनी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. पण तिथे उपचार दरम्यान बैजनाथ शर्मा याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर सहकार नगरमधील नागरिकांनी विरार पोलीस ठाण्यावर मोर्चा नेऊन आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी केली. त्यानंतर पोलिसांनी अवघ्या ४ तासात नितेश हरिशंकर सिंग (२४), संजय भगत, अक्षय अशोक गिरी (२४), इंद्रेश हरिशंकर सिंह (१९), नितेश नरेश माळी (२५), निलेश नरेश माली (२७) या आरोपींना अटक करून त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या आदेशाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे क्राईम पोलीस निरीक्षक दिलीप राख अधिक तपास करीत आहेत.

## लघुशंकेवरून दोन भावात वाद ...

घरात दोघे अविवाहीत भाऊ एकत्र रहात होते. या दोघा भावांच्या सर्वात मोठ्या भावाने मात्र लग्न केले होते. आपल्या परिवारासह आईला सोबत घेत वडीलोपार्जीत राहते घर त्याने कायमचे सोडून दिले होते. उत्राण या गावी असलेले वडीलोपार्जीत घर आणि दोघे लहान भाऊ यांच्यात मोठा भाऊ आणि आई यांना कुठलेही सारस्य नव्हते. गेल्या तेरा वर्षापासून ते चाळीसगाव येथे राहण्यास निघून गेले होते. आपले दोघे अविवाहीत भाऊ उत्राण (गुजर हद्द) या गावी कसे राहतात, काय काम करतात याच्याशी मोठ्या भावाला काही सोयरसुतक नव्हते. भगवान यास अध्यात्म आणि इतिहासाची आवड होती. अध्यात्मासह इतिहासावर बोलण्याची संधी मिळाली म्हणजे तो सोडत नव्हता. थोर पुरुषांविषयी बोलण्यास त्याला आवडत होते. घराबाहेर अध्यात्मावर भरपूर बोलणाऱ्या भगवानचे घरात लहान भाऊ सत्यवान सोबत अजिबात पटत नव्हते. दोघा भावांच्या भांडणाला वडीलोपार्जीत घर विकण्याच्या वादाची किनार होती. दोघे भाऊ रहात असलेले वडीलोपार्जीत घर विकण्याचा हेका भगवान लावत असे. घर विकल्यास येणा-या रकमेत सत्यवान यास हिस्सा हवा होता. मात्र तो हिस्सा देण्यास भगवानची नकारघंटा रहात होती. त्यामुळे दोघा भावात वादाची ठिणगी पडत होती. घर विकून येणा-या रकमेत आपल्याला हिस्सा मिळणारच नसेल तर हे घर कुणी घेवूच नये यासाठी सत्यवान प्रयत्न करत होता. कुणी घर घेण्यास तयार झाल्यास घराला किंमत कमी आली पाहिजे असा देखील सत्यवान प्रयत्न करत होता. दोघा भावांमधे घर विक्रीचा वाद सुरु असल्याचे गावक-यांना माहिती झाले होते. एकंदरीत वडीलोपार्जीत रहात असलेले घर विक्रीच्या विषयावरुन दोघा भावांमधील वाद हा नित्याचा झाला होता. त्यामुळे ते घर विकत घेण्यास कुणी पुढे येत नव्हते. कुणी आल्यास अडून कमी किंमत देण्याची भाषा करत होता. त्यामुळे भगवानला लहान भाऊ सत्यवानचा राग येत होता.

अखेर सत्यवानच्या जीवनातील १२ सप्टेबर २०२२ चा तो अखेरचा दिवस उजाडला. नेहमीप्रमाणे लघुशंका करण्यासाठी सत्यवान घरातील बाथरुम मधे गेला. लघुशंका करुन आल्यावर सत्यवान याने बाथरुम मधे पाणी टाकले नाही. त्यामुळे घरात दुर्गंधी पसरली. लघुशंका केल्यानंतर बाथरुम मधे पाणी न टाकण्याचा हा प्रकार सत्यवान नेहमीच करत होता. त्यावरुन देखील दोघा भावांमधे वाद होत असे. दोघांच्या वादाला एखादे लहानसे कारण देखील पुरेसे ठरत होते. बाथरुम मधे पाणी का टाकले नाही यावरुन भगवानने सत्यवानला खडसावले. सत्यवान याने देखील मोठा भाऊ भगवान यास तेवढ्याच ताकदीने प्रति उत्तर दिले. लघुशंका केल्यामुळे पसरलेल्या दुर्गंधीमुळे अगोदरच भगवानचे डोके भडकले होते. त्यातच सत्यवानचे प्रतीउत्तर ऐकून भगवान अजूनच भडकला. संतापाच्या भरात भगवान याने घरातील लोखंडी मुसळी हाती घेतली. हातातील मुसळीचे एकामागून एक वार भगवानकडून सत्यवानवर होण्यास सुरुवात झाली. मुसळीच्या हल्ल्यात सत्यवान काही क्षणातच गत:प्राण झाला. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागला नाही. सख्ख्या मोठ्या भावाने लहान भावावर मुसळीने हल्ला केला होता. त्या हल्ल्यात लहान भाऊ सत्यवान कायमचा संपला होता. आपला लहान भाऊ हे जग कायमचे सोडून गेल्याचे बघून भगवान काही वेळ अस्वस्थ झाला. सत्यवानच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची कशी? हा प्रश्न त्याला सतावू लागला. त्याने त्याचा मृतदेह घराच्या मागच्या खोलीत ओढत ओढत नेला. कुणाला दिसणार नाही अशा पद्धतीने त्याने सत्यवानचा मृतदेह झाकून ठेवला. या घटनेची त्याने कुठेही वाच्यता केली नाही. सायंकळ झाल्यानंतरदेखील त्याने जेवण केले नाही. लहान भाऊ ठार केल्यानंतर त्याची भुक उडाली होती. न जेवताच तो सायंकाळी गावातील ग्रामपंचायतीच्या ओट्यावर झोपून गेला.

मध्यरात्री सर्वत्र सामसूम झाल्यानंतर तो हळूच आजूबाजूचा कानोसा घेत जागेवरुन उठला. तो वापरत असलेली सायकल त्याने बाहेर काढली. घरात जमीनीवर सांडलेले मयत सत्यवानचे रक्त त्याने पुसून काढले. कपाशी भरण्याच्या पोत्यातील सत्यवानचा मृतदेह त्याने सायकलने गिरणा नदीच्या किनारी वाहून नेला. आपल्याला कुणी बघत नसल्याची खात्री पटल्यानंतर त्याने सत्यवानच्या मृतदेहाचे पोते गिरणा नदीच्या प्रवाहात फेकून दिले. रात्री सुमारे अडीच वाजेच्या सुमारास तो सायकलीने घरी परत आला. त्यानंतर जणूकाही झालेच नाही अशा अविर्भावात भगवान सकाळी कामाला लागला. मात्र दररोज दिसणारा सत्यवान गावात कुठेही दिसत नसल्यामुळे तो एक चर्चेचा विषय झाला होता. दोघा भावांमधील होणारा रोजचा वाद कुणालाच ऐकू येत नव्हता. बघता बघता पाच दिवस उलटून गेले. पाचव्या दिवशी १६ सप्टेबर रोजी भातखेडे येथील धनराज पाटील हे अस्थी विसर्जन करण्यासाठी नदीकाठी महादेव मंदीराजवळ आले होते. त्याचवेळी त्यांना नदी किनारी एका अनोळखी पुरुषाचा फुगलेला व कुजलेला मृतदेह उंबराच्या झाडाजवळ पाण्यात तरंगतांना आढळून आला. त्यांनी लागलीच हा प्रकार उत्राण येथील महिला पोलिस पाटील रेखा पाटील यांच्या कानावर टाकला. घटनेची माहिती मिळताच रेखा पाटील यांच्यासह गावकऱ्यांनी घटनास्थळावर धाव घेतली. या प्रकाराची माहिती कासोदा पोलिस स्टेशनला देण्यात आली. माहिती मिळताच कासोदा पोलिस स्टेशनच्या महिला सहायक पोलिस निरीक्षक निता कायटे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह धाव घेतली. पाण्यात वाहून आलेला सत्यवानचा मृतदेह सर्वासाठी अनोळखी होता. याप्रकरणी सुरुवातीला कासोदा पोलिस स्टेशनला सीआरपीसी १७४ नुसार २०/२०२२ या क्रमांकाने अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. हा घातपाताचा प्रकार असल्याचे लक्षात आल्यानंतर सहाय्यक पोलिस निरीक्षक नीता कायटे यांनी तपासाला वेग दिला. मृतदेहाची ओळख पटवण्याचे गावकऱ्यांना आवाहन करण्यात आले. ओळख पटण्यास फार वेळ लागला नाही. मयताच्या कपड्यावरुन तो उत्राण (गुजर हद्द) गावातील सत्यवान पाटील असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान उत्राण (गुजर हद्द) गावचे पोलीस पाटील राजेंद्र माधव महाजन, सरपंच योगेश सुरेश महाजन यांनी स.पो.नि. निता कायटे यांची भेट घेतली. त्यांनी स.पो.नि. निता कायटे यांना सांगितले की आम्ही रहात असलेल्या गावातील भगवान धोंडू महाजन हा गावातून बेपत्ता झाला आहे. गेल्या पाच दिवसांपासून तो गावात कुठेही दिसत नाही. भगवान आणि त्याचा लहान भाऊ सत्यवान या दोघांमधे वडीलोपार्जीत घरावरुन वाद सुरु होता. गावातून बेपत्ता झालेल्या भगवान यानेच सत्यवानचा घातपात केला असावा असा संशय त्यांनी व्यक्त केला. संपुर्ण गावात देखील भगवानच्या नावाची चर्चा सुरु होती. स.पो.नि. निता कायटे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह उत्राण (गु.ह.) गावी जावून भगवानचा शोध घेतला. तो गावातून फरार झाल्याचे पोलिस पथकाच्या लक्षात आले. अधिक तपासादरम्यान फरार संशयीत भगवान हा एका शेतात व तेथून एका दुचाकीवर डबलसीट बसून एरंडोल बस स्थानकावर गेल्याचे उघडकीस आले. रस्त्यावरील एका पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही फुटेजमधे देखील तो पोलिसांना दिसून आला. त्याचा माग काढत पोलिस पथक एरंडोल बस स्थानकावर जावून धडकले. तो एका कोपऱ्यात लपून बसला होता. पळून जाण्याच्या बेतात असतांनाच त्याला कासोदा पोलिस स्टेशनच्या तपास पथकाने ताब्यात घेतले. स.पो.नि. निता कायटे यांच्यासमक्ष त्याला हजर करण्यात आले. स.पो.नि. निता कायटे यांनी अगोदर आपल्या रसाळ वाणीने व नंतर रणरागीणीचे खाकी रुप दाखवत त्याला गुन्हा कबुल करण्यास भाग पाडले. होय मी लहान भाऊ सत्यवान याची लोखंडी मुसळी मारुन हत्या केल्याचे भगवान याने कबुल केले. हे.कॉ. समाधान दौलत सिंहले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कासोदा पोलिस स्टेशनला भगवान धोंडू पाटील याच्या विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. १२७/२२ भा.द.वि. ३०२, २०१ नुसार नोंद करण्यात आला. पोलिसांच्या ताब्यातील भगवान पाटील यास अटक केल्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला त्याला पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान त्याने आपला गुन्हा कबुल करत सर्व घटनाक्रम कथन केला. संशयीत आरोपी भगवान पाटील सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

## प्रियकरासोबत पळून जाण्याच प्लान...

अशावेळी आपली मोठी बहीण आपल्याला मार्गदर्शन करते. दोन बहिणींमधल्या प्रेमाची तुलना तर कधीच करता येणार नाही. पण अहमदनगर जिल्ह्यातून एक भयानक घटना समोर आली आहे. प्रेम प्रकरणाबद्दल घरच्यांना माहिती दिली या रागातून मोठ्या बहिणीने लहान बहिणीची हत्या केल्याची धक्कादायक घटना अहमदनगर जिल्ह्यात घडली आहे. पोलिसांनी आरोपी बहिणीला बेड्या ठोकल्या आहेत. कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण शिवारात ३० सप्टेंबर रोजी १६ वर्षीय तरुणीचा मृतदेह तिच्याच घरात ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला होता. प्रथमदर्शनी ही आत्महत्या असल्याचे भासत होते. मात्र ही मृतक मुलीची आत्महत्या नसून तिची हत्या करण्यात आल्याचं उघड झालं. विशेष म्हणजे ही हत्या मृतक मुलीच्या १९ वर्षीय मोठ्या बहिणीने केल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. आरोपी मोठी बहीण सृष्टी हिचे श्रीरामपुर तालुक्यातील आकाश कांगुणे नामक तरुणासोबत प्रेमसंबंध होते. ती त्या तरुणासोबत पळून जाणार असल्याबद्दल तिच्या लहान बहिणीने घरच्यांना सांगितलं होतं. त्यानंतर घरच्यांनी सृष्टीला समज दिली होती. तसेच काही दिवस कॉलेजला जाऊ नकोस अशी सक्त ताकीद दिली होती. त्यातूनच प्रेमात आंधळी झालेल्या सृष्टीने मागचा पुढचा कुठलाही विचार न करता ओढणीच्या सहाय्याने गळा आवळून लहान बहिणीची हत्या केली. हत्येनंतर आरोपी सृष्टी ही प्रियकरासोबत ठरल्याप्रमाणे पळून गेली. कोपरगाव पोलिसांनी घटनेचा सखोल तपास करत आरोपी बहीण सृष्टी आणि तिचा प्रियकर आकाश कांगुणे यांना श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथून ताब्यात घेतले. शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त होताच मयताच्या आईच्या फिर्यादीवरून आरोपी सृष्टी बानकर हिच्यावर कलम ३०२ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. मात्र आंधळ्या प्रेमापोटी मोठ्या बहिणीने सख्ख्या लहान्या बहिणीची हत्या केल्याने मोठी खळबळ उडाली

## दोन भावांनी अचूक साधला नेम...

वार करून खून करण्यात आला. ही घटना भंडारा जिल्ह्याच्या तुमसर शहरातील हसाराटोली परिसरात काल (दि.०७) रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी तुमसर पोलिसांनी दोन भावांना अटक केली आहे. विजय श्रीराम नखाते (५२, रा. हसाराटोली) असे मृताचे नाव आहे. तर गणेश बरेकर (३०) व कृष्णा बरेकर (३७) हसाराटोली (दोघे रा. हसाराटोली) अशी आरोपी भावांची नावे आहेत. मृतकाच्या बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी आरोपींचे दोन दिवसापूर्वी भांडण झाले होते. तुमसर शहराला लागूनच असलेली हसाराटोली येथे शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान स्थानिक बौद्ध विहार जवळ विजयच्या हत्येचा थरार घडला. घटना घडताच परिसरात स्मशान शांतता पसरली होती घटनेची माहिती तुमसर पोलिसांना मिळताच त्यांनी घटना स्थळ गाठले.

## गुप्तधनाचा लोभ प्राणावर बेतला...

लटकलेली पर्स होती. त्या पर्समध्ये तिचे आधार कार्ड व रस्त्यावर एक स्कुटी लावलेली होती. तिचा क्र.एम एच ०९ एफ ७७६४ असा होता. यावरून पोलीसांनी मयत महिलेची ओळख ही आरती अनंत सामंत अशी पटविली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मयत महिलेच्या घरच्या लोकांना या विषयी कळविले. ही महिला कोल्हापूर येथील शुक्रवार पेठेत आपल्या भावाच्या घरी राहत होती. आरतीचा भाऊ शिर्डीला गेला असल्याने त्याची पत्नी ही घटनास्थळी आली होती.तिनेच तिची ओळक आरती सामंत अशी पटविली. पोलीसांनी मयतचा आणि घटनाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी तिची भावजेय हिच्याकडून थोडी फार माहिती घेतली असता आरती ही गेल्या पाच सहा महिन्यापासून दोघा मांत्रिकाच्या नादाला लागल्याची माहिती पोलीसाना मिळाली. मयत आरती ही कोल्हापूर येथील आपल्या भावाच्या घरी राहत असताना तिला आपल्या भावाच्या घरातील देवघरात गुप्तधन असल्याचा दृष्टांत झाला. ती ते गुप्तधन मिळविण्याच्या मार्गाला लागली. यातूनच तिची ओळख ही राधानगरी तालुक्यातील जोगेवाडी येथील मांत्रिक नामदेव शामराव पोवार याच्याबरोबर झाली. तिने त्याला आपल्या घरी देवघरात गुप्तधन असल्याचा दृष्टांत झाल्याचे सांगितले. नामदेव पोवार हा मांत्रिक असल्याने त्याने ते गुप्तधन शोधून देतो असे तिला सांगितले.तो गुप्तधन शोधून देतो असे म्हटल्यावर आरती ही वारंवार त्याला भेटू लागली. तो ही तिच्या घरी सारखा येऊ लागला होता.तिचा हा प्रकार तिच्या घरी भाऊ भावजेयला समजल्यावर त्यांनी तिला असा कोणताही प्रकार नाही, तू मांत्रिकांच्या नादाला लागू नकोस असे बजावले होते. तरी ही ती काही त्याचे ऐकायला तयार नव्हती. कारण तिला जो दृष्टांत झालेला होता. त्याला ती चिकटून होती.तिला ते गुप्तधन पाहिजे होते. म्हणून ती नामदेव याच्या संपर्कात सारखी राहत होती. काहीही करून तिला ते गुप्तधन पाहिजे होते.

नामदेवने तिच्या सांगण्यावरून देवघरातील जागेची पाहणी करून काही विधी ही केली होती. या घटनेत दोन महिने सरले.तरीही त्याला त्यात यश येत नव्हते. त्यामुळे आरती त्याचेवर चिडली होती. तिचा त्याचेवरील विश्वास उडाला होता. ती त्याचे बरोबर या कारणातून ती सारखी भांडण करीत होती. ती त्याला सारखा मानसिक त्रास देत होती. तो काही काम करीत नाही याची तिला खात्री झाल्यावर तिने या कामासाठी दुसऱ्या मांत्रिकांचा शोध घ्यायला सुरूवात केली. याचवेळी तिला हातकणंगले तालुक्यातील शिरोली पुलाची येथील किशोर नावाचा मांत्रिक भेटला. तो ही गुप्तधन शोधण्याकामी माहिर होता. आरती सामंत ही किशोरला सारखी घरी बोलावून घेऊन त्याला गुप्तधन शोधण्यास सांगत होती. त्याने ही जागेची पाहणी करून ते गुप्तधन शोधण्यास सुरूवात केली.परंतु त्यात त्याला ही यश आले नाही. या कारणातून किशोर आणि नामदेव या दोघात आता भांडणे लागले होते. आरतीच्या जवळचा नामदेव हा होता.तिचा विश्वास त्याचेवरच जास्त होता. परंतु एक प्रयत्न म्हणून तिने किशोर कडून ही प्रयत्न करून पाहिले होते. गुप्तधन काही केल्या सापडत नव्हते. त्यामुळे आरती ही हैराण झाली होती. त्यातच ती नामदेव याला मानसिक त्रास देत होती. तिला गुप्तधनाची फार मोठी लालसा लागली होती. नामदेवला तर आता असे वाटू लागले की आरतीचा ससेमिरा आपल्यामागील चुकवायचा असेल तर तिचा कायमचा काटा काढावा लागेल.यासाठी तो प्लॅन करू लागला. तो खुद्द पाडळी खुर्द येथील असल्याने त्याला त्या परिसराची चांगली माहिती होती. त्याच्यामार्फत आरतीने २०२१ मध्ये तिने देवघरात खड्डा खोदून पाहिले होते. पण गुप्तधन काही सापडले नव्हते. त्यातून त्या दोघांची भांडणे लागली होती. तिने त्याला तू जर मला गुप्तधन मिळवून दिले नाहीस तर तुला पोलीसात देवून तु मला फसविले आहेस याची तक्रार करेन अशी धमकी ही दिली होती. तिच्या या धमकीला नामदेव घाबरला होता. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. म्हणून त्याने २९ सप्टेंबर २०२२ रोजी आरतीला फोन करून पाडळीला बोलावून घेतले होते. ती कोल्हापूरातून येणार असल्याने तो तिला न्यायला बालिंग्याला आला. तेथून ते दोघे ते दोघे बालिंगा शिरोली दुमला,या रस्त्याने एकत्र वेगवेगळ्या दुचाकीवरून जात होत. पाडळी खुर्द येथील राजवर्धन पाटील याच्या बीगा येथील शेतात ते दोघे गेले.तेथे काही वेळ ते बसल्यावर गुप्तधनाविषयी त्याचेत चर्चा झाली. तो ही तिला गुप्तधन काही मिळत नाही तुम्ही त्याचा नाद सोडा असे सांगत होता.पण ती काही त्याचे ऐकायला तयार नव्हती. यातच तो ही गोष्ट किशोरला का सांगितलीस म्हणून विचारीत होता.दोघा मांत्रिकांतील खटक्यामुळे तिला कोणावर विश्वास ठेवायचा कोणावर नाही असे झाले. गुप्तधन शोधण्यासाठी आरतीने नामदेवला काही रक्कम दिली होती. ती रक्कम ती त्याचेकडे परत मागत होती. पण तो काही तिला ती रक्कम परत दयायला तयार नव्हता.कारण त्याचे म्हणणे असे होते की, तिने ही गोष्ट किशोरला सांगितल्याने नामदेव याचा पचका झाला होता. या कारणातून त्या दोघात वादावादी सुरू झाल्यावर त्याला बाजुलाच पडलेली वीट दिसली.तो अगोदरच तिच्यावर चिडला असल्याने त्याने ती वीट घेतली आणि आरतीच्या मागील बाजुस डोक्यात जोरात घातली.

त्यासरशी तिचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. ती बसल्या ठिकाणी खाली कोसळल्यावर तो ही घाबरला. तरी ही त्याच वीटेने परत जोरदार घाव घातला. त्यात तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. जाताना त्याने आरती हिचे दागिणे आणि मोबाईल ही घेऊन गेला. दुसऱ्या दिवशी ही घटना शेतमालक राजवर्धन पाटील यांना दिसून आली.त्यांनी याघटनेची माहिती गावचे पोलीस पाटील सुरेश पाटील यांना दिली. त्यांनी याघटनेची माहिती करवीर पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची पाहणी करून मयत महिलेची ओळख पटविली. त्यानंतर घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तकास करीत असताना या घटनेविषयी पोलीसांना घटनास्थळी कोणताच पुरावा मिळालेला नव्हता. मयत महिलेचे चप्पल, स्कुटी गाडी आणि आधार कार्ड एवढेच पोलीसांना घटनास्थळी सापडले होते. आरती ही कोल्हापूरहून पाडळीला स्कुटीवरून एकटीच आली हाच धागा पकडून पोलीसांनी बालिंगा ते माळ्याची शिरोली रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले.त्यामध्ये आरती आणि नामदेव हे दोघे वेगवेगळ्या दुचाकीवरून पाडळीकडे जात असल्याचे दिसून आल्यावर पोलीसांनी नामदेव याचा शोध घ्यायला सुरूवात केली. मयत आरती हिच्या भावजेयकडे पोलीसांनी चौकशी केली असता तिने पोलीसांना सांगितले होते की, त्याच्या घरी पाडळी खुर्द येथील मांत्रिक नामदेव पोवार याचे येणे जाणे होते.

आरती ही त्याच्या नादाला लागून गुप्तधनाच्या शोधासाठी प्रयत्न करीत होती. यावरून पोलीसांनी या घटनेचा अवघ्या २४ तासात तपास करून पाडळी खुर्द येथून नामदेव पोवार याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीस या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. मयत आरती सामंत हिच्या भावजेयने दिलेल्या फिर्यादवरून पोलीसानी आरती अनंत सामंत (वय ४५) रा.शुक्रवार पेठ पंचगंगा हॉस्पिटलजवळ हिच्या खून प्रकरणी नामदेव शामराव पोवार (वय २३) रा.पाडळी खुर्द याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ व अंधश्रध्दा महाराष्ट्र अधिनियम कायदया अंतर्गत गुन्हा नोंद करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस स्टेशनचे पो. निरी.अजय सिदंकर याच्या मार्गदर्शनाखाली करवीर पोलीस करीत आहेत. गुप्तधनाची लालसा ही कधी ही वाईटच तरीही अनेकजण मांत्रीकांच्या माध्यामातून गुप्तधान मिळविण्याच्या नादात असतात. आरतीने तर गुप्तधन मिळविण्यासाठी नामदेव पाठीमागे तगादा लावलेला होता. यात त्याला यश ही येत नव्हते.त्यातून त्या दोघात भांडणे होऊ लागली. त्यातूनच चिडून नामदेवने आरतीचा खून केला हेच या घटनेवरून दिसून येते.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच
पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर
प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या
शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

पान ८ वरून....

## श्री केशवराज रेनिसन्स स्कुलमध्ये ...

मत व्यक्त केले. या उत्सवात व नवरात्राच्या पावन पर्वात शाळेच्या प्राचार्या सौ. अलीशा अग्रवाल, उपप्राचार्या सौ.अनुराधा कुलकर्णी सर्व विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी संघ सदस्य, संस्था पदाधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. ज्योती देशपांडे आणि आभार प्रदर्शन सौ.अनुराधा कुलकर्णी यांनी केले.

## शेतकऱ्यांचा विश्वास हिच कारखान्याची...

सहकारी साखर कारखाना गेल्या कांही वर्षापासून बंद होता. हा कारखाना चालू करण्यात यावा अशी मागणी सातत्याने शेतकर्यांतून होत होती. कारखाना चालू करण्यासाठी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पुढाकार घेऊन ओंकार साखर कारखाना प्रा.लि. च्या माध्यमातून सुरु केलेला आहे. कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील व त्यांच्या सहकार्यांनी गेल्या काही दिवसापासून प्रचंड मेहनत घेत कारखाना लवकरात लवकर चालू करण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे सांगत आ. निलंगेकर यांनी आता विजयादशमीच्या मुहूर्तावर गाळप हंगाम सुरु करण्यासाठी आवश्यक असणारे रोलर पुजन करण्यात येत असल्याचे सांगितले. कारखाना हा कोणत्याही पक्षाचा नसून केवळ शेतकऱ्यांचा राहणार असल्याची ग्वाही देऊन शेतकऱ्यांचे हित सर्वतोपरी जोपासण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. कोणताही व्यवसाय अथवा उद्योग मोठा होण्यासाठी ग्राहकांचा आर्शिवाद आणि त्यांचा विश्वास अंत्यत महत्वाचे असल्याचे सांगत यामुळे निश्चितच पत सुद्धा वाढण्यास मोठी मदत होते असे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी शेतकऱ्यांचा विश्वास हिच कारखान्याची पत राहणार असल्याचे स्पष्ट केले. कारखान्याची यशस्वीपणे वाटचाल होऊन तो उत्तमरित्या चालविण्यासाठी शेतकर्यांचे पाठबळ आणि त्यांचा आर्शिवाद महत्वाचा आहे. कारखाना यशस्वीपणे चालविण्यासाठी भिऊ नका आम्ही तुमच्या पाठिशी आहोत असा आर्शिवाद शेतकर्यांनी द्यावा असे आवाहन करून शेतकर्यांच्या विश्र्वासाला कोणत्याही परिस्थितीत तडा जाऊ देणार नाही असा विश्र्वास माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी यावेळी दिला. शेतकर्यांच्या आर्शिवादाच्या बळावर आगामी वर्षात कारखाना प्रशासनाच्या वतीने आसवानी प्रकल्पही सुरु करण्यात येईल अशी ग्वाही माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली. यावेळी निलंगा तालुका अध्यक्ष शाहुराज थेटे, शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, निलंगा शहराध्यक्ष ॲड. विरभद्र स्वामी, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, प्रदेश कार्यकारीणी सदस्या जयश्री पाटील, ज्येष्ठ नेते हावगीराव पाटील, माजी जि.प. सदस्य प्रशांत पाटील, संतोष वाघमारे, मधुकर माकणीकर, जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रल्हाद बाहेती, डॉ. लालासाहेब देशमुख, माजी सभापती शंकरराव पाटील, कारखाना प्रशासनाचे केशव अंकुशकर, सचिनकुमार देशमुख, देवेंद्र बालकुंदे, रावसाहेब देशमुख आदींसह पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑपरेशन परिवर्तन एक सकारात्मक...

ऑपरेशन परिवर्तन मध्ये झाल्याने त्यांचे समुपदेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने प्रभारी अधिकारी कामती पोलीस ठाणे व ऑपरेशन परिवर्तनमध्ये बेगमपूर गाव दत्तक मिळालेले पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर स्थानिक गुन्हे शाखा यांनी केले. समुपदेशन करताना त्यांना एकच विचारले की, अवैध दारू धंद्यातून पैसे मिळतील, पण समाजात सन्मान मिळेल का? याचे एकच उत्तर होते, ते म्हणजे नाही. यातच त्यांचा आत्मसन्मान जागृत झाला व त्यांनी सांगितले की, असा दारू धंदा मी पुन्हा कधीच करणार नाही. त्यांना सन्मान जनक व्यवसाय करण्यासाठी मार्गदर्शन केल्याने त्यांचे मतपरिवर्तन झाले. यातूनच त्यांनी सुरुवातीला छोटी खवाभट्टी चालू केली. सुरुवातीला एक खवाभट्टी त्यानंतर व्यवसायातून मिळालेल्या नफ्यातून त्यांनी दोन खवाभट्ट्या सुरू केल्या. त्यात त्यांची कष्ट करायची तयारी व मानसिकता होती, ती समुपदेशनामुळे आणखी वाढली. त्यात ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत त्यांना वारंवार भेटी देऊन त्यांना प्रोत्साहन दिले गेले, यातच त्यांना त्यांच्या या नवीन चालू केलेल्या व्यवसायात मुलाची साथ मिळाली आणि त्यांनी प्रगती करून १ वर्षात आज रोजी वाफेवर चालणारी तीन युनिट असणारी मोठी खवाभट्टी दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरू केली. त्याचे उदघाटन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले. दोन दिवसांपूर्वी पोलीस अधीक्षक यांना उद्घाटन करण्यासाठी दत्तात्रय जामदार यांनी निमंत्रण दिले असता मॅडम यांनी त्यांची विनंती लगेच मान्य केली, शिवाय त्यांच्या व्यवसाय बँककर्ज प्रकरणात मदत करण्याची ग्वाही दिली. खरोखर मानसिकता बदलली तर ती किती चमत्कार करू शकते, याचेच हे उदाहरण आहे आणि यासाठी ऑपरेशन परिवर्तन मधील पुनर्वसन सोबतच समुपदेशन व जनजागृती हा टप्पा खूप महत्त्वाचा आहे. दत्तात्रय जामदार नेहमी सांगतात की, खरोखर सन्मानजनक व्यवसाय सुरू केल्याने, आज समाजात ही ते ताठ मानेने वावरू शकत आहेत, आमच्यासाठी राबवलेल्या ऑपरेशन परिवर्तन साठी पोलीस अधीक्षक यांचे खूप खूप आभार. दत्तात्रय जामदार यांना पुढील व्यवसायात असेच यश मिळत राहो, अशी शुभेच्छा. तसेच इतर अजूनही मानसिकता न बदललेल्या हातभट्टी व्यवसायिकांची ही मानसिकता अशाच प्रकारे बदलून त्यांना सन्मान जनक व्यवसाय करण्याची सदबुद्धी मिळो.

10 TO 16 OCTOBER 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/8/2022 9:45 PM Page 1



# महात्मा गांधीजींच्या विचारांमध्ये वैश्विकता -न्या.सत्यरंजन धर्माधिकारी




**जळगाव/प्रतिनिधी**

साधन, साध्य, सुचिता, वैश्विकवृत्ती, सेवाभाव हे संस्कार महात्मा गांधीजी आणि लालबहादूर शास्त्री या दोन्ही महापुरुषांचे, वैश्विकता असलेल्या विचारांवर आपण आचरण केले तर खऱ्या अर्थाने त्यांची जयंती सार्थक होईल असे विचार मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. महात्मा गांधीजींची१५४ वी जयंती, लाल बहादूर शास्त्रीजींची ११९ वी जयंती व चरखा जयंती निमित्ताने गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे भव्य अहिंसा सद्भावना शांती यात्रा उत्साहात काढण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर गुजरात विद्यापिठाचे माजी कुलगुरू डॉ. सुदर्शन अय्यंगार, संघपती दलिचंद जैन, आमदार लता सोनवणे, सौ. स्वाती धर्माधिकारी, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक अशोक जैन, जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अनिल जैन, महापौर जयश्री महाजन, सौ.ज्योती जैन, आयुक्त डॉ. विद्या गायकवाड, पोलिस अधीक्षक डॉ. प्रविण मुंढे, सहाय्यक पोलीस अधिक्षक कुमार चिंथा, अप्पर जिल्हाधिकारी प्रविण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी राहुल पाटील, पंजाब फरीदकोट येथील बजीतसिंग तसेच सर्व धर्मगुरू जैन समणीजी सुधाजी, सुयोगनिधी, सुगमनिधीजी, डॉ. सुयश निधीजी, हाफिज अब्दुल रहीम नासिर पटेल, गेव दरबारी, विश्वनाथ जोशी उपस्थित होते.

लाल बहादूर शास्त्री टॉवरपासून या अहिंसा सद्भावना शांति यात्रेची सुरुवात झाली. याप्रसंगी मान्यवारांच्याहस्ते लाल बहादूर शास्त्री यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. अहिंसा सद्भावना शांती यात्रेस माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखविली. यात्रेमध्ये वरील मान्यवरांसह कुलगुरू डॉ. एल. व्ही. माहेश्वरी, डॉ. सुभाष चौधरी, जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकिय संचालक अतुल जैन, जैन परिवारातील सर्व सदस्य, शहरातील प्रशासकीय अधिकारी, मनपा नगरसेवक, लोकप्रतिनिधी, शहरातील मान्यवर, जैन इरिगेशनमधील सहकाऱ्यांसह शहरातील अनुभूती स्कूल, ए.टी. झांबरे, सेंट टेरेसा, विवेकानंद प्रतिष्ठान, आर आर विद्यालय, प. न. लुंकड कन्या विद्यालय, या. दे. पाटील, श्रीराम विद्यालय, स्वामी समर्थ, गुळवे स्कूल, ला.ना. स्कूल, आर.आर. विद्यालय यासह विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही यात्रा लालबहादूर शास्त्री टॉवरपासून निघून, म.न.पा इमारतीचे सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, पंडीत जवाहरलाल नेहरू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक मार्गाने महात्मा गांधी उद्यानात पोहोचली. या यात्रेत गांधीजींच्या जीवनातील बदलत जाणाऱ्या वेशभुषेच्या माध्यमातून ‘मोहन ते महात्मा’ असा प्रवास दाखविणारा सुंदर चित्ररथ, तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने प्रतिकात्मक तिरंगा यात्रेत लक्षवेधी ठरत होता. शांती यात्रेच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी सुंदर रांगोळ्यांची सजावट करण्यात आली होती.उद्यानातील महात्मा गांधीजींच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर यात्रेतील सर्व सहभागींसोबत गांधी उद्यानातील ओपन सभागृहात विश्व अहिंसा दिनानिमित्त मा.न्या. सत्यरंजन धर्माधिकारी यांनी संबोधन केले. उद्योग, राजकारण, प्रशासन यासह सर्वच क्षेत्रात महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या विश्वस्तवृत्ती प्रमाणे आपण सर्वांनी आचरण केले पाहिजे. कार्य हे प्रादेशिक असले तरी त्याची व्याप्ती वैश्विक असावी, हा महत्त्वाचा संस्कार महात्मा गांधीजींचा आहे. दोघंही

## भव्य अहिंसा सद्भावना शांती यात्रा उत्साहात

महापुरूषांचे चरित्र आजच्या काळात देखील खूप आदर्श व मार्गदर्शक ठरणारे आहे. न्याय व संविधानातसुध्दा गांधी विचार आहे. साधन व साध्य शुद्ध ठेवायला हवे म्हणजे खऱ्या अर्थाने आपण ट्रस्टशिप जपलेली आहे असे ठरेल, असे विचार माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. हा देश सांभाळायचा असेल तर प्रत्येकांशी प्रेमाने वागावे. श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी जैन इरिगेशनच्या माध्यमातून जय किसान हा नारा खऱ्या अर्थाने सत्यात उतरविला आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये येथे खूप मोठे कार्य होत आहे असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी भाषणामध्ये केला. आपण सर्वांनी निर्भय राहावे आणि घृणा करायची नाही. प्रेमात खूप मोठी ताकद आहे. त्यामुळे आपण प्रेमाने राहावे व निर्भय बनावे असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. जैन समणी डॉ. सुयशनिधीजी यांनी देखील उपस्थिततांशी संवाद साधला त्यांनी अहिंसा या विषयावर प्रकाश झोत टाकला.अहिंसेचे महत्त्व सांगितले. निषेधात्मक व विधायकत्मक अहिंसेचे आचरण करावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचे मंचावर आगमनवेळीच श्री. अशोकभाऊ व सौ. ज्योतीभाभी जैन यांच्या हस्ते सुती हाराने स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. उपस्थित सर्वांनी सर्वधर्म प्रार्थना म्हटली गेली. विवेकानंद संगित विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ‘वैष्णव जन तो...’ हे भजन सादर केले. मान्यरांच्या हस्ते गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या डिप्लोमा प्राप्त विद्यार्थ्यांना तसेच जीआरएफ प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. सुदर्शन अय्यंगार यांनी उपस्थितांना अहिंसेची शपथ दिली. प्रास्ताविक डॉ. अश्विन झाला यांनी केले. सूत्रसंचालन गिरीश कुलकर्णी यांनी केले. रिती शहा यांनी आभार मानले. महात्मा गांधी जयंती चरखा जयंती म्हणूनही साजरी केली जाते. त्यानिमित्ताने गांधीतीर्थ मधील सहकाऱ्यांनी कार्यक्रमात पुर्णवेळ चरख्यावर सुतकताई केली. याशिवाय गांधी तीर्थ येथे दिवसभर अखंड सुतकताई करण्यात आली. यामधे गांधी तीर्थ येथे भेट देणाऱ्या अभ्यागतांनी व विद्यार्थ्यांनीही यात सहभाग घेतला.

# वाहनचोरी, मोबाईल चोरीच्या १६ गुन्ह्यांची उकल

# ११ दुचाकी व २३ मोबाईल जप्त करण्यात शांतीनगर पोलिसांना यश




**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात वाहन चोरीच्या घटना वाढल्या असताना शांतीनगर पोलिसांनी चार आरोपींच्या मुसक्या आवळत ११ दुचाकी २३ मोबाईल दोन चैन स्नेचिंग अशा १६ गुन्ह्यांची उकल करीत ८ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे. पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शना खाली पोलिसांची वेगवेगळी पथके वाहन चोरी मोबाईल चोरी व चैन स्नाचिंग च्या दाखल गुन्ह्यांचा तपास करीत असताना पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, विक्रम मोहिते,निलेश बडाख,,सपोनि शैलेंद्र म्हात्रे, पो उपनिरी निलेश जाधव, भोलासो शेळके व पोलीस कर्मचारी रवींद्र चौधरी, महेश चौधरी, तुषार वडे, रिजवान सैयद,प्रसाद काकड, श्रीकांत पाटील, किरण जाधव, किरण मोहीते, संजय पाटील, सचिन सांयखिडीकर, अमोल इंगळे, रविद्र पाटील, दीपक सानप या पथकाने सुनील उर्फ सोन्या शंकर फुलारे वय २० रा.लहुजीनगर, कल्याण, आयाज अली रेहमतअली अन्सारी वय ३८ रा.चिरागनगर घाटकोपर, दाऊद शोएब अन्सारी वय २८ रा गुलजार नगर भिवंडी, सर्फराज रेहमतअली खान वय २६ रा.भिवंडी या चार जणांच्या मुसक्या आवळून त्यांच्या ताब्यातून ११ दुचाकी, १ रिक्षा, दोन सोन्याच्या चैन व २३ चोरीचे मोबाईल असा एकूण ८ लाख १७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत शांतीनगर येथील १३ ,शहर पोलीस ठाण्यातील २,नारपोली पोलीस ठाण्यातील १ अशा एकूण १६ चोरीच्या गुन्ह्याची उकल केली आहे अशी माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. मोबाईल नेपाळ येथे विक्रीसाठी जाणार होते. यामध्ये सराईत मोबाईल चोरीतील २३ मोबाईल हे सर्फराज रेहमतअली खान नेपाळ येथे विक्री साठी पाठविणार असल्याची खबर गुप्त बातमीदारा मार्फत शांतीनगर पोलिसांना मिळाली असता तातडीने कारवाई करीत सर्फराज रेहमतअली खान याच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या मुळे हा मुद्देमाल हस्तगत करता आला. हे मोबाईल नेपाळ येथे गेले असते तर या मोबाईलचा ठावठिकाणा लागणे मुश्किल होते.

# सिद्धार्थ नगर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी लाखो अनुयायांसह दीक्षाभूमीवर धम्मदीक्षा घेतली होती. त्या अनुषंगाने बुधवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी वाड्यातील तमाम बौद्ध बांधव व भगिनींनी सिध्दार्थ नगर येथील बौद्ध विहारात एकत्र जमून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार व तथागत गौतम बुद्धांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. बुद्धवंदना घेऊन झाल्यावर सर्व मान्यवरांनी येथे पंचशील ध्वजारोहण करून मानवंदना दिली. एकमेकांना विजया दशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. येथील स्थानिक नगरसेवक रामचंद्र जाधव यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अनेक बौद्ध बांधव व भगिनी उपस्थित होत्या.

# ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत मुळेगाव तांडा आणि भानुदास तांडा येथे अवैध देशी गावंठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त

**सोलापूर/प्रतिनिधी**

ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत मुळेगाव तांडा व भानुदास तांडा येथे अवैद्य हातभट्टी दारूच्या भट्ट्या उध्वस्त करण्यात आल्या. एकूण ४ लाख ६८ हजार रूपये किंमतीचे २१ हजार २०० लिटर गुळमिश्रीत रसायन, १०६ प्लॅस्टिक बॅरेल व ३२० लिटर हातभट्टी दारू जागेवरच नष्ट करण्यात आले. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या संकल्पनेतुन सुरू असलेल्या ऑपरेशन परिवर्तन अभियानाअंतर्गत सोलापूर ग्रामीण जिल्हयातील अवैध्यरित्या हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे अवैध्यधंदयावर वेळोवेळी कारवाई करून अवैध्य धंदयाचे समुळ उच्चाटन करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव व उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती उपविभाग सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी मुळेगाव तांडा व भानुदास तांडा येथे ४ ऑक्टोबर रोजी विशेष मोहिम राबवुन अवैधरित्या चालणाऱ्या दारूच्या हातभट्टया वर छापे टाकुन कारवाई करून अवैध देशी गावठी दारूच्या हातभट्टया उदध्वस्त केल्या आहेत. सोलापूर तालुका पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखे कडील अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी मुळेगांव तांडा व भानुदास तांडा येथे अवैधरित्या चालणाऱ्या गावंठी दारूच्या हातभट्टयावर टाकलेल्या छापा कारवाईत एकूण ४ लाख ६८ हजार २०० रूपये किंमतीचे त्या मध्ये २१ हजार २०० लिटर गुळमिश्रीत रसायन, १०६ प्लॅस्टीक बॅरेल व तयार केलेली ४ रबरी टयुब मध्ये एकुण ३२० लिटर हातभट्टी दारू ३२ हजार असे एकुण किंमतीचे गावंठी हातभट्टी दारू जागेवरच फोडुन त्यातील गुळमिश्रीत रसायन व हातभट्टी दारू जागेवरच नष्ट करण्यात आले



आहे. मुळेगाव तांडा व भानुदास तांडा या ठिकाणी अवैध दारूच्या हातभट्टया उध्दवस्त केलेल्या ठिकाणी ८ इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यापुर्वी देखील सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात चोरून चालणाऱ्या अवैध देशी गावंठी दारूच्या हातभट्टया उदध्वस्त करून कारवाई करण्यात आलेली आहे. यापुढेही अशा व इतर प्रकारच्या चोरून अवैध व्यवसाय करणाऱ्या इसमा बाबत गोपनियरित्या माहिती प्राप्त करून त्यांचे विरूध्द कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांनी सांगितले आहे. सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती सोलापूर उपविभाग सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांचे नेतृत्वाखाली राखीव पोलीस उपनिरीक्षक काटे, स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर तसेच स्थागुशा व सोलापूर तालुका पोलीस ठाणे कडील पोसई बनसोडे, सपोफौ बागवान, मसपोफौ घोळवे, पोहेकॉ महिंद्रकर, पोहेकॉ देवकर, पोहेकॉ स्वामी, पोना सय्यद, पोना माळी, पोना चमके, पोना मोरे, पोना आसिफ शेख, पोना मुजगोंड, पोना मुल्ला, पोकॉ किशोर सलगर, पोकॉ नदाफ, मपोकॉ साबळे, मपोकॉ चिनगुंड, मपोकॉ खोत व पोलीस मुख्यालय कडील कार्यरत असलेल्या पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदारांनी बजावली आहे.

# भिवंडीत पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या एका युवकास घेतले ताब्यात

भिवंडी : पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटने कडून दहशतवादी कृत्यांसाठी निधी दिला जात असल्याचा आरोप असून त्यातून एनआयएने देशभरात धडसत्र सुरू असून त्या अंतर्गत भिवंडी शहरातील बंगालपुरा येथे ठाणे येथील एटीएस पथकाने कारवाई करीत मोईनुद्दीन मोमीन या युवकास ताब्यात घेतले आहे. भिवंडी शहरातील बंगालपुरा या परिसरात राहणार मोईनुद्दीन मोमीन हा घरा शेजारील इमारती मधील दुकानात चॉकलेट बिस्कीट याचा घाऊक व्यवसाय करीत होता. व त्या ठिकाणाहून तो पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेसाठी काम करीत असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# इंद्राळ येथील रास्त भाव दुकानचा नायब तहसीलदारांनी केला पंचनामा

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील इंद्राळ येथील रास्त भाव दुकान विरोधात आलेल्या तक्रारीवरून सोमवार दि.१२ सप्टेंबर रोजी नायब तहसीलदार विलास तरंगे यांनी भेट देऊन पंचनामा केला.. सदरील रास्त भाव दुकानदार एस. के. तेलंग यांच्या विरोधात इंद्राळ येथील ६३ रेशनकार्ड लाभार्थ्यांनी दि.६ सप्टेंबर रोजी देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. त्यामुळे नायब तहसीलदार विलास तरंगे यांनी इंद्राळ येथील रास्त भाव दुकानास सोमवारी भेट देऊन सदरील प्रकरणाची चौकशी करून पंचनामा केला. यावेळी तहसील कार्यालयातील पेशकार साळुंखे, रफिक मचकुरी इंद्राळ येथील सरपंच व तलाठी व्हि.एस. कुकर यांच्यासह आदी उपस्थित होते.

# देवणी खुर्द सोसायटीच्या नवीन रास्त भाव दुकानचे शुभारंभ

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील देवणी खुर्द येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या नवीन रास्त भाव दुकानचे विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर बुधवार दि.५ ऑक्टोबर रोजी नुतन चेअरमन रतन गरड यांच्या हस्ते करण्यात आले. येवून उपस्थित काही लाभार्थ्यांना सदरील रास्त भाव दुकानचे कामकाज संचालक छान मुराळे यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार आहे. यावेळी उपस्थित लाभार्थ्यांना रेशनचे वाटप करण्यात आले. यावेळी चेअरमन रतन गरड, व्हाईस चेअरमन माधव पाटे, सरपंच यशवंत कांबळे, संचालक मनोहर पाटील, किशन पाटील, अभंग उर्फ फगिरा सुर्यवंशी, संजय गरड, संचालक राम धनासुरे, छान मुराळे, माधव पाटील, राजकुमार कुमदाळे, राजु गरड, बालाजी कारभारी, अंकुश गुरमे, सुनिल पाटील, सुनिल कांबळे, अनिल मुराळे, सुनिल मुराळे यांच्यासह आदी रास्त भाव दुकानदार उपस्थित होते.

**जिल्हा परिषद पालघर**

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/४५/२०२२ दिनांक : ०३/१०/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचे कडील जलजीवन मिशन कार्यक्रम २०२१-२२ अंतर्गत मोखाडा तालुका येथे वितरण व्यवस्था करणे. जि. पालघर (एकुण ०६) कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०३/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १०/१०/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-

(जी.पी. निवडंगे)

कार्यकारी अभियंता

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

जिल्हा परिषद, पालघर

10 TO 16 OCTOBER 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/8/2022 9:45 PM Page 1



# भोईवाड्यात एसआरएच्या इमारतींना गळती!

## ● वर्ष झाले तरी तक्रार अर्जाची दखल नाही ● छत कमजोर झाल्याने कोसळण्याचा धोका






**मुंबई/प्रतिनिधी**

एसआरए अर्थात स्लम रिहॅबलेशन ऑथरेटी! ज्याला मराठीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण म्हणतात. पण झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याच्या नावाखाली एसआरए आणि बिल्डर यांची अभद्र युती कशा प्रकारे लोकांची फसवणूक करीत आहे आणि निकृष्ट बांधकाम असलेल्या इमारतींमध्ये लोकांना सदनिका देऊन कशाप्रकारे त्यांच्या जीवाशी खेळत आहेत याचे भयंकर उदाहरण मुंबईच्या परेल-भोईवाडा येथील एसआरएच्या इमारतींमध्ये बघायला मिळत आहे. भोईवाड्याच्या जेरबाई वाडिया मार्गावर असलेल्या ५ हजार झोपड्यांचे एस आर ए योजने अंतर्गत २२ मजल्यांच्या ६ इमारतींमध्ये पुनर्वसन करण्यात आले. मात्र या इमारती बांधून जेमतेम ६ ते ७ वर्ष झालेली असताना या इमारतींना गळती लागलेली आहे. ओमकार बिल्डरने या इमारती बांधल्या आहेत. मात्र या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून ओसी अर्थात भोगवटा प्रमाणपत्र मिळायच्या आतच या इमारतींना गळती लागली आहे. या सहा इमारतींपैकी इमारत क्रमांक ५ मध्ये बापू अण्णा जाधव नावाचे गृहस्थ ४१८ क्रमांकाच्या सदनिकेत राहतात. पण गेल्या दीड वर्षांपासून त्यांच्या घरामध्ये ६ ठिकाणी गळती लागली आहे. याबाबत त्यांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये एसआरएकडे लेखी तक्रार केली होती. पण वर्ष व्हायला आले तरी त्यांच्या तक्रारीची एसआरए प्राधिकरणाने दखल घेतलेली नाही. गळतीमुळे छत कमजोर झालेय.ते कोसळून जीवित हानी होण्याचा धोका आहे. पण एसआरएच्या अधिकाऱ्यांना त्याची काहीच पडलेली नाही. एसआरएचे अधिकारी हे बिल्डरचे दलाल आहेत, असा गंभीर आरोप जाधव यांनी केला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जाधव हे व्यवसायाने पत्रकार आहेत. त्यांनी दैनिकाच्या लेटरहेडवर एसआरएकडे गेल्या वर्षी लेखी तक्रार नोंदवली पण एसआरएच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. त्यामुळे सरकारच्या सेवा हमी कायदयान्वये, एसआरएच्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी आणि जाधव यांच्या घराला लागलेली गळती तात्काळ दुरुस्त करून थांबवावी. अशी मागणी त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# विरार पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर संपन्न







**विरार/प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाला दोन वर्षे पूर्ण झाले याचे औवचित्त साधून विरार पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. पोलिसावर सतत असलेला कामाचा ताण त्यामुळे आरोग्यावर लक्ष देण्यात येत नाही म्हणून पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे बीपी, रक्त तपासणी, इसीजी तसेच ब्लड प्रेशर तपासणी करण्यात आली. हे शिबिर शुक्रवारी विरार पोलीस ठाणे येथे आयोजित करण्यात आले होते. विरार येथील एका रुग्णालयातील डॉक्टर्स आणि परिचारीका यांनी तपासणी केली. या कार्यक्रमाला पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बल यांचे कर्मचारीही उपस्थित होते. विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे यांच्या आदेशाने व क्राईम पीआय दिलीप राख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.




**विरार कातकरी पाडा येथील भावधारा ॲकेडमी इंग्लिश स्कूलला मुंबई येथील रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४१ चे अध्यक्ष राजीव पंटर, क्लब प्रमुख रोटेरियन श्रीमती स्लशा तथा रोटेरियन श्रीमती माहेरा यांच्या तर्फे विरार येथील भावधारा ॲकेडमिला ६ लॅपटॉप भेट देण्यात आले. भावधारा ॲकेडमीच्या मुख्याध्यापिका श्रीमती देवी पिरसाली आणि प्रमुख लीला पुरुषोत्तम यांनी ही भेट स्वीकारली. रोटरी क्लबला प्रेरित करण्यापासून ते लॅपटॉप देण्यापर्यंत रोटेरियन रितेश शेठ यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. लॅपटॉप भेट दिल्यामुळे गोरगरीबांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन मिळेल ही भूमिका संस्थापक लीलाधर पिरसाली यांनी केली.**

# शेतकऱ्यांचा विश्वास हिच कारखान्याची पत -आ.संभाजी पाटील निलंगेकर

**निलंगा/प्रतिनिधी**

उद्योग आणि व्यवसाय वाढविण्यासाठी ग्राहकांमध्ये पत वाढविण्यासह त्यांचा विश्वास संपादन करणेही तितकेच आवश्यक असते. साखर कारखान्यासाठी शेतकरी हा ग्राहक राजा असून त्यांचा विश्वास हिच कारख्यान्याची पत राहणार असून यासाठी शेतकर्यांनी आर्शिवाद द्यावा असे आवाहन करून शेतकऱ्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही अशी ग्वाही माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथे डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना भाडेतत्वावर चालविण्यासाठी ओंकार साखर कारखाना प्रा.लि. यांनी घेतला आहे. या कारखान्याच्या गाळप हंगाम २०२२-२३ साठी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते विजयादशमीच्या मुहूर्तावर रोलर पुजन




करण्यात आले यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, भाजपाचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, डॉ. समीधाताई पाटील निलंगेकर, माजी जि.प. अध्यक्ष मिलींद लातूरे, संघटन सरचिटणीस संजय दोरेवे, ॲड. संभाजीराव पाटील, खादी ग्राम उद्योगचे चेअरमन दगडू साळूंके, कारखान्याचे कार्यकारी संचालक उमाकांत कांदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.शेतकर्यांच्या दृष्टींने अतिशय महत्वाचा असणारा निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथे डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर ...पान ६ वर

# ऑपरेशन परिवर्तन एक सकारात्मक बदल; समर्थ खवा सेंटर बेगमपूर याचे पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते थाटात उद्घाटन!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यात दारू निर्मिती व विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी तो व्यवसाय सोडून सन्मान जनक व्यवसाय सुरू करून परीवर्तन झालेल्याचा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांचे हस्ते सन्मान करण्यात येत आहे. १ सप्टेंबर २०२१ रोजी बेगमपूर हे गाव ऑपरेशन परीवर्तन मध्ये घेण्यात आले. तेथील सर्व हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्या इसमांनी तो व्यवसाय सोडून इतर सन्मानजनक व्यवसाय सुरू केला. त्यामध्ये काहींनी मासेमारी, काहींनी ट्रान्सपोर्ट व्यवसाय, काहींनी वडापाव गाडा, तर काहींनी शेती करायला सुरुवात केली. यातील दत्ता भोई हे पूर्वी अवैध हातभट्टी दारू निर्मिती करत होते, त्यांनी तो व्यवसाय सोडून सध्या ट्रान्सपोर्ट व्यवसाय आणि पिठाची गिरणी चालू केली आहे. त्यामुळे त्यांचा पोलीस



अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अशाच ऑपरेशन परिवर्तन मधील आणखी एका व्यक्तीने एक वर्षापूर्वी खवा तयार करून विक्रीचा व्यवसाय चालू केला. त्याचे सुरुवातीच्या काळामध्ये छोट्या व्यवसायातून आज त्यांनी वाफेवर चालणारी मोठी खवाभट्टी सुरू केली, त्यानिमित्ताने हा छोटेखानी लेख. दत्तात्रय जामदार यांचा समावेश एक वर्षापूर्वी ऑपरेशन परिवर्तनमध्ये करण्यात आला. काही वर्षापूर्वी दत्तात्रय जामदार हे ड्रायव्हिंगचा व्यवसाय करत होते, परंतु काही दिवसांनी तब्येतीच्या कारणाने त्यांना ड्रायव्हिंग व्यवसाय सोडावा लागला. म्हणून त्यांनी २००४ साली हॉटेलचा धंदा सुरु केला. हॉटेल धंद्यामध्ये नुकसान झाल्याने दत्तात्रय जामदार हे कालांतराने हातभट्टी दारू विकू लागले. त्यांचा समावेश ...पान ६ वर

# श्री केशवराज रेनिसन्स स्कुलमध्ये रामलीला उत्सव

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्री केशवराज् रेनिसन्स इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलमध्ये याही वर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर आणि विलोभनीय रामलीला सादर केली. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून पद्मविभूषण डॉ.अशोकराव कुकडे आणि सौ.जोत्स्ना कुकडे काकू यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. रेनिसन्स शालेय समिती अध्यक्ष डॉ.मनोज शिरूरे यांच्या हस्ते डॉ.कुकडे काका यांचे रामचरितमानस ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले.रेनिसन्स सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या सौ. अलीशा अग्रवाल यांच्याहस्ते रामदरबार देऊन सौ.जोत्स्ना कुकडे यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर प्रत्यक्ष रामलीलेचे सादरीकरण झाले. यात राम- लक्ष्मण बालपण, वनवास, तारका वध, शुर्पनखा, पंचवटी, अहिल्या उद्धार, माता शबरी भेट, रामसेतू, अशोक



वाटिका, राम रावण युद्ध अशा अनेक प्रसंगांतून रामायण प्रत्यक्ष दाखवण्यात आले. या रामलीला कार्यक्रमास संस्थेचे पालक विवेकदादा आयाचित, भाशिप्र संस्था उपाध्यक्ष तथा स्थानिक समन्वय समिती कार्यवाह जितेश चापसी, आस्था संकुल व केशवराज ज्युनियर कॉलेज अध्यक्ष नितिनभाऊ शेटे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, केंद्रीय कार्यकारिणी सदस्या सौ. वर्षाताई मुंडे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय कुलकर्णी, रेनिसन्स सीबीएसई स्कूलचे अध्यक्ष डॉ.मनोज शिरूरे, केशवराज प्राथमिक अध्यक्षा सौ.योगिनीताई खरे, आस्था केंद्र प्रमुख उमेश गाडे, जनसंपर्क अधिकारी राहुल गायकवाड, केशवराज माध्यमिकचे उपमुख्याध्यापक बाळासाहेब केंद्रे, माजी विद्यार्थी संघ उपाध्यक्ष प्रदीप राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ.अशोक कुकडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना काकांनी केवळ रामायण पाहू नका तर ते अंगिकारा, आत्मसात करा असे ...पान ६ वर

# बब्रुवानजी खंदाडे यांचा नागरी सत्कार

**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर तालुक्यातील हिप्परगा (कोपदेव) येथे अंबिका माता नवरात्र महोत्सव समितीच्या वतीने बब्रुवानजी खंदाडे यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरीक भगवानराव पाटील हे होते तर सत्कार मुर्ती बब्रुवानजी खंदाडे, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी (नगरसेवक, न.प.अहमदपूर) रामानंद मुंढे (वृक्ष मित्र), पारनाथ गुट्टे (माजी सरपंच, देवकरा), रघुनाथ मुंढे (माजी सरपंच, सताळा) मधुकरराव अंकुलगे आप्पा (जेष्ठ नागरीक) शिवाजीराव गोरटे (माजी सरपंच) गोविंदराव पाटील, दिलीपराव चोपडे, अनिलकुमार गोरटे, लक्ष्मणराव कदम, गोविंदराज लोहबंदे, केशव गोरटे, बिभिषण आगलावे, सुधाकर आगलावे, मधुकर केंद्रे, गुणवंतराव आगलावे, सुधाकर केंद्रे, विष्णू महाराज चोपडे, परशुराम कदम, सोनेराव गोरटे प्रल्हाद आगलावे, दत्ता आगलावे, माधव कदम, दिनकर आगलावे, खाजासाब शेख, मौलासाब शेख, विष्णू आगलावे, माधव डोंगरे आदीची उपस्थिती होती. यावेळी बोलताना बब्रुवानजी खंदाडे म्हणाले की,



माझा पुनर्जन्म झाला आहे. मी यापुढे देवाने दिलेले बोनस आयुष्य म्हणून प्रामाणिकपणे जनतेची सेवा करणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंबिका माता नवरात्र समितीचे अध्यक्ष श्री भगवानराव कदम, सचिव शरद गोरटे, कोषाध्यक्ष पवन कदम, कार्याध्यक्ष गोविंदराव कदम आदिनी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन श्री. विष्णू महाराज चोपडे यांनी केले तर आभार गोविंदराव पाटील यांनी मानले.

# गावठाण क्षेत्रात लागवड केलेल्या रोपवनात वन्यजीव सप्ताह साजरा



**औसा/प्रतिनिधी**

७ रोजी औसा तालुक्यातील हरेगाव येथे १४ महीण्यापूर्वी लागवड केलेल्या रोपवणात वन्यजीव साजरा करण्यात आला. मा.श्री सचिन रामपुरे वनपरिक्षेत्र अधिकारी लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्पनेतून मौ. हरेगाव जुन्या गावातील गावठाणात चौदा महिन्यापूर्वी लागवड केलेल्या रोपवनात सुशीला देवी दगडूजी देशमुख विद्यालय हरेगाव येथील विद्यार्थ्यांची व गावातील नागरिक यांची रॅली काढून रोपवनात लागवड केलेल्या रोपांची प्रजातीवाईज माहिती विद्यार्थ्यांना देऊन वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री डोंगरे डी.जे होते. कार्यक्रमासाठी गावचे सरपंच श्री संजय पवार,कोव्हाळे माजी सैनिक नरसिंग डोंगरे, वनपरिमंडळ अधिकारी औसा श्री पी एस चिल्ले. नियतक्षेत्र वन अधिकारी श्री जी एच घुले, श्री एम डी. मुंडे, श्री एस.डी शिंदे, व वनसेवक सिताराम त्र्यंबक शिंदे व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामपंचायत दातिवरे निवडणुकीत उच्च शिक्षित उमेदवार निवडणुक रिंगणात




**पालघर/एच. लोखंडे**

पालघर तालुक्यात मुदत संपलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी, जोराने वारेवाहून अनेक बदल घडत आहे. यासाठी सर्व पक्ष आप आपली ताकत अजमावण्यासाठी प्रयत्नात आहे. त्या अनुशंगाने ग्रामपंचायत दातिवरे ता,जि पालघर येथील निवडणुकीत मा. श्री. एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री साहेब यांच्या नेतृत्वाखाली, मा. श्री. राजेंद्र गावित - खासदार पालघर, मा. श्री. रविंद्र फाटक - आमदार, मा. श्री. श्रीनिवासन वनगा - आमदार बोईसर श्री. राजेशभाई शहा - पालघर जिल्हा शिवसेना प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व पालघर तालुक्यातील प्रशासकीय / राजकीय / सामाजिक क्षेत्रातील अनेक वर्षाचा अनुभव असलेले दातिवरे गावाचे सुपुत्र ॲड. निलेश रमेश राऊत यांच्या सहकार्याने, दातिवरे गावाचा सर्वांगिण विकास / प्रगती करीता. ग्रामस्वराज्य पॅनल माध्यमातून उच्च सुशिक्षित, तरूण, तडफदार उमेदवार दातीवरे गावाच्या, सरपंच पदाच्या व सदस्य पदासाठी निवडणूक रिंगणात उतरून, आपले राजकीय, सामाजिक भवितव्य व गावाचा विकास घडविण्यासाठी प्रयत्न शिल आहे. ग्रामस्वराज्य पॅनल व्दारा, दातिवरे सरपंच पदासाठी, निकेत अनिल घरत - (एम. कॉम. एम. बी. ए.) सदस्य पदासाठी - १) भरत देवजी वैद्य - वार्ड अ, २) धर्मेंद्र शशिकांत वैद्य - वार्ड ब, ३) सौ. कविता सुंदर राऊत - वार्ड ब, ४) जितेंद्र वामन राऊत - वार्ड ड, या मधुन यांचे राजकीय, सामाजिक भवितव्य मतदार दाता, मते देऊन घडवणार. उच्च शिक्षित उमेदवार विषयी गावात चर्चा असून, निवडणूकीच्या निकला अंती विजयाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार हे १७ ऑक्टोंबर २०२२ लाच समजणार.